SARTHAK

WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

# वार्षिक अहवाल
# २०२२-२३

ज्ञानरूपी विठ्ठलाच्या दर्शनाची हो तयारी!
ध्येयपूर्तीच्या दिशेने चालते संकल्प वारी!


# सार्थक संकल्प



## SARTHAK WELFARE FOUNDATION

www.sarthakwelfarefoundation.org
www.facebook.com/Sarthak Welfare Foundation/

makealifemeaningfull@gmail.com
contactsarthakfoundation@gmail.com



**Dr. Vishnu.R. Marathe**
(Our founder)

## Board of Directors

**Dr. Vishnu R. Marathe**
Founder President

**Mrs. Swati Pradip Namjoshi**
Executive Director

**CA Pradip Namjoshi**
Chief Financial Officer

**Mrunal Rajhans**
Chief Executive Officer

## Core Team (Office)

Sangita Sabnis
Anjali Pitke
Sangram Madne
Akshay Khollam
Trupti Joshi

## Core Team (Counsellors & Trainers)

Manjiri Takale
Meghali Raje
Seemantini Gokhale
Manjiri Laghate
Anagha Hanamsagar
Rashmi Patwardhan
Sandhya Patil
Karuna More
Archana Joshi
Shefali Phalak
Manli Umranikar

## Audit & Compliance advisors

CA Mahesh Joshi
CA Sameer Mehendale
CS Bhargavi Bhide & Associates
Mrs. Amruta Ranade.

# वार्षिक अहवाल २०२२-२३

## Our Mission

Creating a small yet sustainable positive change in our society by reaching out to every individual every day; collectively working towards making a worthwhile contribution to positive and progressive human development.

# सार्थक संकल्प



# SARTHAK WELFARE FOUNDATION

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

**Education: Skill Development: Health: Mentoring**

# सार्थक संकल्प


सार्थक – एक संकल्प वारी! २
स्वाती नामजोशी

वार्षिक अहवाल २०२२–२३ ४
मृणाल राजहंस

नवभारत उभारणीतील युवा सहभाग ७
शेखर जोशी

चंद्रयान–३ १०
कु. हर्षदा सयाजी कामठे

सार्थक – एक वारी शिक्षणाची १२
सौ. मयुरी मिलिंद रोकडे

सुरुवात एका आशेची!!! १४
मेघाली राजे, मंजिरी टकले

तिमिरातुनी तेजाकडे १५
संध्या पाटील

प्रोजेक्ट शिक्षा.... घे भरारी....! १६
करुणा मोरे, अर्चना जोशी

वाटचाल समृद्धीची... १७
संध्या पाटील

स्वप्नं मानसीचे! १८
मानसी ढमाले

प्रोजेक्ट लक्ष्य १९
समुपदेशक– करुणा मोरे

किर्तनातून उत्कर्ष ! २०
मोनाली नरुटे

पंखांना वेध आकाशाचे! २२
प्रगती जकाते

प्रोजेक्ट लक्ष्य २३
अंजली पिटके

देणाऱ्याचे हात हजार!! २५
स्वाती नामजोशी

TEAMWORK... २७
स्वाती नामजोशी

Donors २८
Associates & Project Partners

# १ सार्थक - एक संकल्प वारी!

**स्वाती नामजोशी**

SARTHAK
WELFARE FOUNDATION



सार्थक आज सहा वर्षे पूर्ण करुन सातव्या वर्षात पदार्पण करत आहे. अगदी वारकरी, ज्या प्रमाणे पंढरपुरात पालखी बरोबर जाण्यासाठी नित्यनेमाने संकल्प करतो, सर्व तयारी. जमवाजमव करतो, नियोजन करतो, मजल दरमजल करीत एकादशीला श्री विठ्ठलाच्या दर्शनाला जातो आणि भगवंताच्या दर्शनाने धन्य होऊन कृतार्थ भावाने परत फिरतो, अगदी तीच भावना आमच्या सर्वांच्या मनात असते. आमच्या व आमच्या मुलांच्या स्वप्नपूर्तीच्या या वारीत, आम्ही आनंदाने सहभागी होतो. प्रत्येक वर्षी आम्ही नवनवीन संकल्प करतो, कामांचे नियोजन करतो, हाती आलेली कामे एकत्र येऊन निगुतीने पूर्ण करतो. मुलांनी मिळवलेल्या यशात, त्यांच्या धेय्य प्राप्तीच्या आनंदात आम्ही कृतार्थ होतो... पुन्हा एकदा पुढच्या वारीच्या नियोजनाला उत्साहाने सुरवात करतो. असे असताना देखील, केलेल्या कामांचा आढावा घेताना, अगदी सार्थकच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत झालेल्या कामाबद्दलचा विचार जेव्हा मनात येतो तेव्हा झालेल्या कामाचं समाधान वाटतच पण त्याच बरोबरीने, आपण हिच गोष्ट काही वेगळ्या पध्दतीने करु शकलो असतो का अशी भावना देखील मनात येते व अजून वेगळे काय करता येईल याचा विचार करावासा वाटतो.

संस्थापातळीवरती, तीन गोष्टींचे अनन्यसाधारण महत्व आहे. सातत्य, प्रयोगशीलता आणि सर्वसमावेशकता! एक संस्था म्हणून बाळगायचे नियम, विचारपूर्वक घालुन दिलेल्या प्रोसेस आणि व्यवहारांची पारदर्शकता व प्रयत्नांचे सातत्य ह्या सर्व गोष्टी संस्थेच्या प्रगतीकरता जितक्या महत्वाच्या तितकीच महत्त्वाची आहे प्रयोगशीलता.
प्रयोगशीलता हि प्रगतीची पायाभूत गरज आहे असं मला वाटतं. वेगळे काही प्रयोग करणं, रुढपध्दत बदलून बेस्ट प्रॅक्टिसेस चा अभ्यास करुन आपल्या कामांमधे त्यांचा अंतर्भाव करणं हे कुठल्याही संस्थेकरता आवश्यक असते. ह्या करता सार्थकला, इतर अनेक समविचारी संस्थांनी अवलंबलेल्या पध्दतीचा अभ्यास करुन, काही चांगल्या पध्दतीचा अंगिकार करण्यासाठी बरेच काम करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. तसेच डीजिटल माध्यम व विद्यार्थी मित्र–मैत्रीणींना उपयुक्त होईल अशी विविध विषयांवरील, उपलब्ध माहीती, व्हिडीयो यांचे परीपूर्ण संकलन करुन ते सहज सोप्या पध्दतीने मुलांना उपलब्ध होईल अशा स्वरूपात सार्थकच्या संकेतस्थळावरही टाकणं, मेंटॉरना उपयुक्त व मार्गदर्शन होईल याकरता ट्रेनिंग मॉड्यूल्स, काही उपयुक्त वाचन साहित्य याचा देखील समावेश व्हावा या करता आम्ही प्रयत्नशील आहोत.

सर्वसमावेशकता म्हणजेच, जेव्हा संस्थेची उद्दीष्टे, संस्थेच्या देणगिदारांची व सहभागी कंपनीची उद्दीष्टे, संस्थेतील कर्मचारी व लाभार्थी यांची धेय्य एकमेकांना पूरक होतात त्याचवेळी एक

अखंड– परस्पर पूरक युनिट म्हणून संस्था उत्तम प्रकारे कार्यरत राहु शकते. या करता समविचारी व एकमेकांना पूरक अशी माणसे व संस्था संघटीत व्हाव्या लागतात. सार्थकला सुदैवाने अशाच संस्था लोकांचा सहभाग कायम मिळालेला आहे. मागील वर्षी, पाचशे मुलांपर्यंत पोहोचायचा संकल्प सार्थकने केला होता त्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. मुलांना सोप्पे जाईल या करता आम्ही '' सार्थक मैत्र" ची वेबसाईट वेगळी करुन त्या वरती स्कॉलरशिपकरता थेट अर्ज करता येण्याची सोय केलेली आहे. त्याचप्रमाणे, मेंटॉरना आमच्यापर्यंत पोहोचता यावे या करता त्यांना देखील अर्ज करायची सोय उपलब्ध आहे. याच संकेतस्थळावर आम्ही वेगवेगळी ट्रेनिंग मॉड्यूल्स व मुलांना उपयोगी होतील असे व्हिडीयो व मार्गदर्शनपर माहिती संकलित करत आहोत.

आमच्या अनेक मुलांनी नेत्रदीपक कामगिरी करुन घवघवीत यश संपादन केले आहे. आमच्या सुरवातीच्या बॅच ची अनेकमुले आता नोकरीत स्थिरावत आहेत. सार्थक मधील प्रत्येकासाठी हा अभिमानाचा व आनंदाचा क्षण आहे. आपल्या समाजात अतिशय गरीब व होतकरू अशा अनेक मुलामुलींपर्यंत पोहोचवायची नितांत आवश्यकता आहे. आमच्या या वारीत महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी व मेंटॉर सामिल व्हावेत व प्रत्येक मुलामुलींना या स्वप्नपूर्तीचा, ध्येय प्राप्तीचा आनंद मनमुराद घेता यावा या करता सार्थकची संपूर्ण टीम कार्य तत्पर आहे.

गेल्या सहा वर्षांत मदतीचा ओघ वाढला आहे. आमचे देणगीदार व आमचे कार्पोरेट पार्टनर यांनी सातत्याने दाखवलेल्या विश्वासामुळेच आज आम्ही पाचशे मुलांचा व अनेक प्रकल्पांचा टप्पा गाठू शकलो आहोत. त्यांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे आमच्या वाढलेल्या जबाबदारीची मला पूर्ण जाणीव आहे. आपल्या सर्वांनी वारंवार दिलेल्या मदती बद्दल, आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल व आपल्या सहभागाबद्दल, आमचे देणगीदार, असोसिएट, प्रोजेक्ट पार्टनर व माझे सहकारी यांची मी अत्यंतिक ऋणी आहे. आपल्याशिवाय आत्तापर्यंतचा प्रवास अशक्य होता. आपले सर्वांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा पाठीशी आहेत म्हणूनच पुढच्या प्रवासाचा संकल्प सोडण्याचे बळ आमच्या पंखात घेऊन आज सातव्या वर्षात पदार्पण करत आहोत. सार्थकच्या या सहा वर्षांच्या वाटचालीबद्दल मी कृतज्ञभावाने एवढेच व्यक्त करु शकते...

काळ सहा वर्षांचा....
स्वत:च्या शोधात हरवण्याचा
चाचपडताना सूर गवसण्याचा
धेय्य निश्चिती आणि संकल्पनेचा
एकत्र येऊन केलेल्या संघर्षाचा
प्रोजेक्ट बांधणीतल्या आनंदाचा
काळ सहा वर्षांचा!

कोविड मधल्या अनिश्चिततेचा
भय, अनारोग्य व आर्थिक विवंचनेचा
एकमेकांना धीर देत चालण्याचा
आधारामुळे सावरण्याचा...
पडत, धडपडत, पुन्हा धावण्याचा
परीवर्तनाचा, पुनर्नियोजनाचा
काळ सहा वर्षांचा!

मुलांनी दाखवलेल्या जिद्दीचा
सहकाऱ्यांनी पूर्ण केलेल्या कामांचा
देणगीदारांनी ठेवलेल्या विश्वासाचा!
आश्रयदात्यांनी दिलेल्या भक्कम पाठींब्याचा
मुलांनी परीश्रमांनी मिळवलेल्या यशाचा
ध्येयप्राप्तीच्या जल्लोषाचा!
काळ सहा वर्षांचा!

नववर्षाच्या नव संकल्पांचा!
अवलोकनाचा–आत्मपरीक्षणाचा,
आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा!
प्रयोगशीलतेचा, सकारात्मक बदलांचा
नवनवीन गोष्टी शिकायचा, शिकवायचा!
उत्साहाने पुढचे पाऊल टाकायचा!
पुढचा पल्ला गाठायच्या निश्चयाचा!
काळ सहा वर्षांचा!

धन्यवाद

**स्वाती नामजोशी**
**संचालिका**



# २ वार्षिक अहवाल २०२२-२३

## मृणाल राजहंस



सार्थक वेलफेअर फाउंडेशनची स्थापना होऊन सहा वर्षे पूर्ण झाली आणि सार्थकने सातव्या वर्षात यशस्वी पदार्पण केले. ज्या मुलांचं पालकत्व आपण सहा वर्षांपूर्वी स्वीकारलं ती मुलं आपापल्या क्षेत्रात यशस्वी झाली आणि त्यांची जागा आमच्या नवीन मुलांनी घेतली.

एप्रिल २०२२ पासून Emerson कंपनीने आपल्या पन्नास मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले आणि सार्थकसोबतच्या त्यांच्या प्रवासाला सुरुवात झाली. दहावीमध्ये उत्तम गुण मिळवलेल्या मुलांची आपण या प्रकल्पासाठी निवड केली आणि त्याचे नामकरण केले 'प्रोजेक्ट सक्षम'! या अंतर्गत या प्रकल्पातील मुलांना फक्त आर्थिक मदत नव्हे तर त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनेही अनेक सत्र घेतली जातात, यामध्ये जीवनमूल्य, करिअर मार्गदर्शन, अभ्यास कौशल्य इत्यादी विविध सत्रांचा समावेश असतो.

सन २०२१ पासून सुरू असलेल्या 'प्रोजेक्ट शिक्षा' या प्रकल्पाचे दुसरे वर्षही असेच दणक्यात सुरू झाले. श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगावच्या आजूबाजूच्या परिसरातील शाळांमधून दहावी उत्तीर्ण झालेल्या गरजू व हुशार मुलांची निवड करण्यात आली. Opus Consulting Solution कंपनी सोबत सुरू असलेल्या या प्रकल्पातील पहिल्या बॅचची मुले आज बारावी उत्तीर्ण झाली व पदवीपूर्व अभ्यासक्रमांना त्यांनी प्रवेश घेतला आहे. दरवर्षी ओपस तर्फे २५ मुलांना, रुपये २५००० अशी वार्षिक स्कॉलरशिप दिली जाते. या उपक्रमात ओपसमधील पदाधिकारी वर्गाचा देखील सक्रिय सहभाग आहे. आपल्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून या मुलांचे मेंटरींग करण्याची त्यांची इच्छा आहे. यासंदर्भात सार्थकने ओपस येथे त्यांचे प्रशिक्षण सत्रदेखील घेण्यात आले. पुष्कर औरंगाबादकर यांनी mentoring या विषयावर तेथील पदाधिकाऱ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले. आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा या मुलांना व्हावा या उद्देशाने ओपसने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

खेड व चाकण परिसरातील हुशार व होतकरू मुलींसोबत सुरू असलेला 'प्रोजेक्ट लक्ष 'हा Tenneco Clean Air कंपनीचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प! या प्रकल्पातील मुलींची संख्या यावर्षी ४० झाली आहे. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असूनही या मुलींनी दहावी व अकरावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवले आहे. ग्रामीण भागात केवळ आर्थिक विकास होऊन चालणार नाही तर तिथे आजची तरुण पिढी, जी आपल्या देशाचे भविष्य आहे, त्या तरुण पिढीचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. ही गरज ओळखून सार्थकने या मुलींची काही सत्रे घेण्यास सुरुवात केली, त्यामध्ये आवश्यक जीवन कौशल्यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.तसेच या विद्यार्थिनींमध्ये कलेकडे पाहण्याची दृष्टी निर्माण व्हावी त्याचबरोबर आपली संस्कृतीही जोपासली जावी या उद्देशाने दिवाळी व उन्हाळी कार्यशाळेचे आयोजनही करण्यात येते.

प्रोजेक्ट शिक्षा व प्रोजेक्ट लक्ष या दोन्ही प्रकल्पातील मुलांना सन २०२२ मधील जुलै महिन्यात स्कॉलरशिपचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला, निवड झालेली मुले व त्यांचे पालक उपस्थित होते.

चाकण व ढवळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी समारंभात हा सोहळा संपन्न झाला. मुलांना स्कॉलरशिपबरोबर शैक्षणिक साहित्याचेही वाटप यानिमित्ताने करण्यात आले.

महाराष्ट्र टाइम्सच्या 'बळ हवे पंखांना' या उपक्रमांतर्गत अत्यंत हुशार परंतु आर्थिक दृष्ट्या कमकुवत मुलांसाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले जाते आणि त्यातून मिळणाऱ्याा निधीचा उपयोग या मुलांच्या पुढील शिक्षणासाठी केला जातो. मटा स्कॉलरशिपची आमची ही तिसरी बॅच! या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सार्थक सतत प्रयत्नशील आहे. आर्थिक मदती बरोबरच या मुलांचे करिअर मार्गदर्शन, त्यांच्याशी नियमित संवाद, गृहभेटी याद्वारे आपण सतत त्यांच्या संपर्कात असतो आणि त्यांच्या प्रगतीचा आढावा घेत असतो.

आजच्या विज्ञान– तंत्रज्ञानाच्या युगात संगणक ही काळाची गरज बनला आहे.बारावीनंतर तर कुठलाही अभ्यासक्रम निवडला तरी त्याला संगणकाची जोड ही आवश्यकच असते, हीच गरज ओळखून Emerson कंपनीने याही वर्षी आपल्या ७५ मुलांना लॅपटॉप दिले. मुलांना नक्कीच याचा खूप फायदा होतो आहे.

Flagship project म्हणता येईल अशा आमच्या प्रोजेक्ट विद्याचे हे चौथे वर्ष! कल्याणी टेक्नो फोर्ज दरवर्षी ५०–६० हुशार व होतकरू मुलींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देते. यावर्षी रवी नगरकर सरांनी सासवड, वडगाव, लोणावळा येथील पाच अनाथाश्रमांमधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची कल्पना बोलून दाखवली. आणि सार्थकने अर्थातच ती उचलून धरली. तेथील मुलींच्या मुलाखती, त्यांची कल क्षमता चाचणी, करिअर मार्गदर्शन ही सर्व जबाबदारी आमच्या कौन्सेलर्सनी यशस्वी रीतीने पार पडली. अतिशय भिन्न कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थितीतून आलेल्या मुलींचे अनुभव थक्क करणारे होते. या आश्रमांमधील ९१मुलींची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली आहे. आपल्या मागील तीन बॅचमधील मुली देखील उत्तम यश संपादन करत आहेत. २०२० बॅच मधील अनुजा गर्जे हिने NEET मध्ये ५२७ मार्क्स मिळवले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी तिचे प्रयत्न सुरू आहेत. अर्थातच सार्थक आणि KTFL खंबीरपणे तिच्या मागे उभे आहेत.

बिन भिंतीची उघडी शाळा, लाखो इथले गुरु,<br>
झाडे, वेली, पशु, पाखरे यांसी गोष्टी करू...

आमच्या सर्व मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच अभ्यास कौशल्य जीवन कौशल्य संवाद कौशल्य ताणाचे व्यवस्थापन, भावनांचे विश्लेषण, करिअर समुपदेशन, पैशाचे नियोजन अशा एक ना दोन अनेक गोष्टी शिकवल्या जातात. त्याचबरोबर वेगवेगळ्या विषयांवर कार्यशाळा शैक्षणिक सहली, Industry Visit असेही निरनिराळे उपक्रम राबवले जातात.या सर्व गोष्टी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत यावर आमचा ठाम विश्वास आहे.

मुलांना ऐतिहासिक वास्तूंची भेट घडवून आणणे, निसर्गाशी जवळीक साधायचा प्रयत्न करणे आणि हे करता करता Enjoyment सोबतच टीम बिल्डिंग, परस्परांना मदत करणे, याची आपोआपच सांगड घातली जाते मग ती किल्ले शिवनेरी सहल असो, सज्जनगड वाई सातारा परिसराची भ्रमंती असो किंवा राळेगणसिद्धीमध्ये जाऊन अण्णा हजारे यांच्यासोबत ग्रेट भेट!!!

मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारा निखळ आनंद आणि त्यांनी दिलेला प्रतिसाद बघून आपण योग्य मार्गावर आहोत याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. केवळ १५ मुलांबरोबर सुरू झालेल्या आमच्या या प्रवासात आज ५०० च्या वर मुलं,कौन्सिलर, ट्रेनर, मेंटॉर सहभागी झालेले आहेत.

मुलांनी त्यांच्या अभ्यासामध्ये मिळवलेले यश आणि त्यांच्या करिअरची यशस्वी वाटचाल हीच आमच्या कामाची पावती असते, तरीदेखील कौतुकाचे काही शब्द, पाठीवरची शाबासकीची थाप आणि आपल्या कामाची इतरांनी घेतलेली दखल आपल्या मनाला उभारी देतात आणि आपला हुरूप द्विगुणित करतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीतर्फे 'सेवाव्रती' म्हणून सार्थकच्या डायरेक्टर स्वाती नामजोशी यांचा केला गेलेला सत्कार हे त्याचेच प्रतीक आहे. कुठल्याही सामाजिक संस्थेकरता अशी कौतुकाची थाप अतिशय प्रेरणा देणारी असते. सकारात्मक सामाजिक बदलांचे उद्दिष्ट ठेवून सर्व सहकारी एक दिलाने काम करत असतात. हे काम एकमेकांच्या सहकार्याशिवाय विश्वासाशिवाय व सातत्याने केलेल्या प्रयत्नांशिवाय अपूर्ण असते.

देही आरोग्य नांदते,<br>
सौख्य नाही या परते..

असं म्हणतात.. निरोगी शरीर म्हणजे देवाचा अधिवास!! आरोग्य चांगले असल्यास त्या व्यक्तीचा, तिच्या कुटुंबाचा तसेच समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. चांगले आरोग्य हीच खरी संपत्ती आणि त्यामुळे 'आरोग्यम् धनसंपदा' असे आरोग्याच्या बाबतीत म्हटले जाते.

हाच महत्त्वाचा विचार घेऊन Mind Tickle Interactive Media Private Limited तसेच Tenneco Clean Air India Private Limited यांच्या सहकार्यातून सार्थकने दोंदे, कडूस चांदोली या गावांमध्ये आरोग्य शिबिरे घेतली. शाळेतल्या मुलांबरोबर त्यांच्या आईची पण आरोग्य तपासणी ही संकल्पना गावातील सगळ्या लोकांनी उचलून धरली आणि शिबिराला गावकऱ्यांचा व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावर्षी रामनवमीच्या अत्यंत पवित्र दिवसाचे औचित्य साधून एरंडवणा येथील पांडुरंगाच्या मंदिरात विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर व विचारांवर सुप्रसिद्ध कलाकार श्री. शरद पोंक्षे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आणि त्याच व्यासपीठावरून जमलेल्या हजारो भाविक आणि

श्रोत्यांसमोर सार्थक च्या कामाची माहिती दिली गेली. दुग्धशर्करा योग यापेक्षा काय वेगळा असतो! सार्थकचा हा बहुमान आहे असे मला वाटते.

आपली परंपरा जपताना समाजभान आणि समाजऋण ठेवून समाजातील दुर्बल घटकांना आपल्या आनंदात सहभागी करून घ्यावं या उद्देशाने साडेतीन मूहूर्तातील एक अशा अक्षय्यतृतीयेच्या दिवशी आपण वेगवेगळे उपक्रम राबवत असतो. यावर्षी पुण्यातल्या पाच वस्त्यांमधील फूटपाथवरील शाळेत शिकणाऱ्या मुलांना, बेघर आणि अनाथ वृद्धांचा संभाळ करणाऱ्याा संस्थांना तसेच विकलांग मुलांचा प्रेमाने सांभाळ करणाऱ्या संस्थांना अन्नदान करण्याचा संकल्प सार्थकने सोडला. अनेक लोकांनी या उपक्रमात सार्थकसोबत येण्याची इच्छा प्रदर्शित केली व त्यांनी विनाविलंब आर्थिक मदतही देऊ केली. या सर्व दानशूर व्यक्तींप्रती सार्थक सदैव ऋणी आहे.

दररोज अनेक खेड्यापाड्यातून रुग्ण उपचाराकरता पुण्यात धाव घेतात ती ससून सर्वोपचार रुग्णालयात! बऱ्याच गोरगरीब रुग्णांच्या नातेवाईकांना अक्षरश: फूटपाथवर आसरा घेऊन राहावे लागते. दररोजच्या जेवणाचे देखील हाल होतात.आज आपण सेवादीपच्या सहकार्यातून अशा अनेक लोकांच्या नाश्त्याची व जेवणाची सोय केली आहे.

जगी ज्यास कोणी नाही, त्यास देव आहे... तो देणाऱ्यांच्या हजारो हातातून व समाजसेवकांच्या अविश्रांत कामातून व इच्छाशक्तीतून अनेक चांगल्या कामाकरता कायमच आपल्या सोबत असतो आपण फक्त माध्यम असतो ती मदत योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठीचे!

सार्थकचे काम हे फक्त महाराष्ट्रातील लोकांपुरतेच मर्यादित नाही तर मणिपूर, मिझोराम, नागालँड, अरुणाचल प्रदेश अशा पूर्वांचल मधील अनेक होतकरू मुला—मुलींना शिक्षणासाठी व स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी जनकल्याण समिती महाराष्ट्रात ठिकठिकाणी पूर्वांचल निवासी छात्र प्रकल्प राबवत आहे. सार्थकतर्फे पुण्यातील छात्र निवासाला शिधा वाटप केले गेले तसेच तेथील मुलींचे समुपदेशन करिअर मार्गदर्शन व मेंटॉरिंग देखील करण्याचा आमचा मानस आहे.

आम्हा सर्वांचा काम करण्याचा हुरूप वाढतो तो आपण मेंटॉरिंग करत असलेल्या मुलांमुळे!! अतिशय प्रतिकूल परिस्थितीत, नोकरी करत, घरातल्या जबाबदाऱ्या सांभाळत, आई — वडिलांची काळजी घेत जेव्हा ही मुलं घवघवीत यश संपादन करतात तेव्हा त्यांच्या व आपल्या परिश्रमांचं सार्थक झाल्यासारखं वाटतं.

याच आमच्या गुणी मुलांमधला एक म्हणजे रोहित! रोहित यावर्षी सीएची परीक्षा पास झाला आणि एका बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये उत्तम पगारावर रुजू देखील झाला.. अत्यंत प्रतिकूल कौटुंबिक परिस्थितीतील रोहितने दिवस—रात्र अभ्यास करून त्याच्या आईवडिलांची, कुटुंबीयांची व आपल्या संस्थेची मान उंचावली. त्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आज आपली अनेक मुले अत्यंत अवघड अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरी जात आहेत.

सार्थकच्या प्रगतीत आमच्या सगळ्या असोसिएट्सचा, आमच्या मुलांचा आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आमची सपोर्ट सिस्टीम असलेल्या आमच्या ट्रेनर्स, कौन्सिलरचा खूप महत्त्वाचा वाटा आहे,ही गोष्ट मला मुद्दाम नमूद करावीशी वाटते.

तुम्हा सगळ्यांचे सहकार्य आणि सद्भावना सार्थकसोबत आहेतच.. आणि इथून पुढेही आमच्या सर्व हितचिंतकांच्या आशीर्वादाने सार्थकची वाटचाल अशीच अविरत चालू राहील आणि अनेक मुलांच्या आयुष्यात आशेचा एक नवीन किरण येऊन त्यांचे अवघे जीवन प्रकाशमान होईल अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझे दोन शब्द संपवते.

मृणाल राजहंस
प्रमुख कार्यकारी अधिकारी
सार्थक वेल्फेअर फौंडेशन



The roots of education are bitter, but the fruit is sweet.

**– Aristotle**


३

# नवभारत उभारणीतील युवा सहभाग

शेखर जोशी



माझ्या आयुष्यातील जवळपास बेचाळीसहून अधिक वर्षे पुण्यातील एका नामवंत वाहन उत्पादन कारखान्यात मी व्यतीत केली. त्यानंतर सार्थकच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील अनेक तंत्र निकेतन संस्थांतील (आय.टी.आय.) युवक मित्रांशी विविध विषयांवर संवाद साधला. निवृत्तीनंतर आजही भारतातील विविध राज्यांतील अनेक उद्योग किंवा कारखाने यांना कामानिमित्त भेटी देत आहे. त्या कारखान्यांमधून वेगवेगळ्या उद्योग प्रक्रिया होत असतात. अशा ठिकाणी कार्यरत असलेली हजारो प्रकारची यंत्रे, जुने – नवे तंत्रज्ञान, त्यांच्या कार्यप्रणाली जवळून बघण्याचा योग मला लाभला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करणारे कुशल युवा – युवती, स्वप्नं बघणारी तरुण मने मला भेटतात...त्यांच्याशी मी संवाद साधतो. आजची जिद्दी तरुणाई मला आकर्षित करते. त्यांची शिकण्याची इच्छा, त्यांनी घेतलेले कष्ट, आपल्या कुटुंबाला समृद्ध करण्यासाठी त्यांचे अविरत झटणे आणि यशस्वी होण्यासाठी त्यांनी केलेले निरंतर प्रयत्न आणि सातत्य पाहून मी स्तंभित होतो. माझ्या अनुभवांच्या बैठकीच्या आधारावर केलेले हे कथन!




अलीकडेच दक्षिणेतील चेन्नई येथील एका कंपनीत जाण्याचा मला योग आला. चारचाकी (कार) साठी लागणाऱ्या इंजिनची निर्मिती त्या कंपनीत होते. एका मोठ्या जर्मन वाहन कंपनीसाठी हे उत्पादन होते. सगळा कारखाना अतिशय आधुनिक पद्धतीने उभारला आहे. 'ग्रीन बिल्डिंग' तत्वावर बांधलेली कारखान्याची इमारत, कारखान्याच्या मेन गेटपासून आतील सर्व परिसर अतिशय स्वच्छ ठेवला होता. 'गोष्टीसाठी जागा आणि जागेवर वस्तू' ठेवण्यातील शिस्त (बाग झाडण्याचा झाडू, गवत छाटणीचे यंत्र, पाला–पाचोळा साठवणूक व्यवस्था...इत्यादी), टापटीप वाखाणण्याजोगी होती. कुठेही फतकल मारून बसले तरी कपडे खराब होणार नाहीत, अशी स्वच्छता !

कुंपणाला लागून असलेले बेल, कडुलिंब, मिरे, तमालपत्र अशा विविध भारतीय आयर्वेदिक वृक्षांची रांग दिमाखात उभी होती. साधारण ७ ते ८ एकर परिसर... मोठा मोहक ! कारखान्यात अत्याधुनिक मशीन्स... छताला लावलेल्या पारदर्शक पत्र्यांमुळे कामाच्या ठिकाणी भरपूर नैसर्गिक उजेड, वीज न लागणारे पण हवा बाहेर

सोडण्यासाठी छताला असलेले पंखे (एअर व्हेन्टिलेटर्स), कामाच्या जागेवर ठराविक अंतरावर हिरवा, पिवळा आणि लाल रंगाच्या कचरा टाकण्याच्या मोठ्या पेट्या... उत्तम कचरा व्यवस्थापन असल्याच्या या खुणा ! कारखान्यात फेरफटका मारताना छान वाटत होते. हे वास्तव की स्वप्न...? आपण भारतातच आहोत का...? असा भास मला झाला.

प्रत्यक्ष इंजिन जुळणी (असेम्ब्ली) आणि टेस्टिंग करणारे तरुण कामगार, उत्पादन करत असताना त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविणारे, मार्गदर्शन करणारे अधिकारी यांच्याशी संवाद साधत होतो. बोलता–बोलता कामगार आणि अधिकारी यांचे सरासरी वय विचारता ते अवघे २५ वर्षे असल्याचे कळले...! म्हणजे हा सर्व जुळणी–व्याप ही तरुणाई समर्थपणे सांभाळत होती तर !

विशेष म्हणजे कामगारांनी केलेलं काम ते स्वत:च तपासून आपली सही कामाच्या चेक शीट वर करत होते. त्यावर कोणी देखरेख करणारे नव्हते.! सुरक्षितता, पर्यावरण आणि गुणवत्ता यांचे महत्व सांगणारे फलक कंपनीत जागोजागी होते. कंपनीच्या आवारात 'नो टोबॅको'– तंबाखू किंवा धूम्रपान वर्ज्य, हे कंपनीचे आणखी एक महत्वाकांक्षी धोरण होते. त्याचे पालन देखील सगळे करत होते.

दुपारचे जेवण घेताना ही तरुण मंडळी सोबत होतीच. प्रत्येक जण अगदी अभिमानाने आपल्या कंपनीची प्रगती सांगत होता.. यंत्रांची देखभाल, वैयक्तिक सुरक्षितता, पर्यावरण भान त्यांच्या बोलण्यातून समजत होते. आपली, यंत्रांची सुरक्षितता याचे महत्व त्यांच्या शब्दांतून प्रतीत होत होते. जवळच्या गावांतून या तरुणांनी राबविलेले वेगवेगळे उपक्रम... यांतून त्यांची सामाजिक बांधिलकी अधोरेखित होत होती. गावातील मुलांना शारीरिक स्वच्छतेचे, आरोग्याचे महत्व पटवून देणे, संगणक शिक्षण देणे, पावसाचे पाणी वाचवणे आणि त्याचा पुनर्वापर करता येण्यासाठी योजना करून देणे... ही सगळी माहिती मला मिळत गेली !

आमचा मुक्काम तीन दिवस होता. त्यामुळे यातील निवडक युवकांशी बोलता आले. मुथ्थुकुमार नावाचा एक युवक अधिक स्मरणात राहिला. आमच्या राहण्याच्या जागेपासून पहिल्या सकाळी आम्हाला कंपनीत घेऊन जाण्यासाठी तोच आला होता. तीनही दिवस तो जणू आमच्या दिमतीला होता. दुसऱ्या दिवशी काम आटोपल्यावर आम्ही निवांतपणे कॉफीचा आस्वाद घेत होतो. मुथ्थुकुमार देखील आमच्या सोबत होता. बराच गप्पिष्ट असल्याने त्याला बोलते करावे लागत नव्हते ! बोलण्याच्या ओघात सहज त्याला त्याचा दिनक्रम विचारला. तो जे सांगत होता, ते ऐकून मी चाट पडलो ! तो सांगू लागला –

''माझे घर कंपनीपासून पंधरा कि. मी. वर असलेल्या छोट्याशा गावात आहे. मी पहाटे चार वाजता उठतो. आवरून झाल्यावर साधारण ५ किलोमीटर पळून येतो. येताना वाटेत नदी लागते, तिथे व्यायाम, योगासने आणि ध्यान धारणा करतो. घरी आलो, की गोठ्यातल्या गाईंना चारा–पाणी देऊन त्यांचे दूध काढतो.

गावातीलच एका दूध संकलन संस्थेच्या ऑफिसमध्ये ते दूध पोचवतो. हे होईपर्यंत साधारण सहा वाजतात. हाताशी उणा–पुरा दीड तास उरतो. मग मी अभ्यासाला बसतो. (मुत्थुकुमार B.E मेकॅनिकल केले आहे...)

आता M-Tech च्या दुसऱ्या वर्षाची परीक्षा मी देणार आहे. नंतर नऊ वाजता कंपनी गाठतो. संध्याकाळी सहा वाजता कंपनी सोडतो. घरी गेल्यावर घरातील कामात थोडीफार मदत करतो. गावाबाहेर असलेल्या टेकडीवर चक्कर मारून घरी येतो. पुन्हा तासभर अभ्यास होतो. रात्रीचे जेवण घरातील सगळे एकत्र घेतो आणि साधारण साडे दहाच्या सुमारास झोपतो. झोपण्यापूर्वी जगभरातील घडामोडी, नवीन तंत्रज्ञान, अभिनव कल्पना असलेली एक तरी व्हिडीओ क्लिप 'यु–ट्यूब' वर बघतो. यातून कंपनीतील प्रक्रियेत सुधारणा करण्याची स्फूर्ती मिळते... " इतके बोलून तो थांबला आणि म्हणाला – "आता मला जायला हवे. नाहीतर रोजची टेकडीवरील चक्कर चुकेल !"

त्या दिवशी या मुथ्थुकुमार नावाच्या मुलामध्ये मला आजच्या युगातला खराखुरा भारतीय युवक भेटला. ज्याच्याकडून प्रेरणा घ्यावी...अशी लाखो युवा मुले भारतात आहेत. त्यांची संख्या वाढायला हवी. ध्येयाने झपाटलेली अशी सजग मुलेच उद्याचा बलशाली भारत घडवणार आहेत, यात शंका नाही. स्वातंत्र्य मिळून आज आपण अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहोत. भारत हा आजवर विकसनशील देश आहे. अर्थव्यवस्थेच्या सकल अंतर्गत उत्पन्न या निकषावर भारत आज पाचव्या स्थानावर पोचला आहे. अमेरिका, चीन, जपान, जर्मनी हे देश आपल्या पुढे आहेत. आपल्या या प्रगतीमध्ये तरूणाईचाच सिंहाचा वाटा राहिला आहे. आज विकसित देशांत आपल्या देशाची गणना व्हायची असेल, तर आपल्या देशातली तरूण मने त्या मुथ्थुकुमार सारखी चेतवलेली असणे अतिशय गरजेचे आहे.

विपरीत आणि अस्थिर परिस्थितीवर मात करत आगेकूच करणे,

हे भारतीयांचे वैशिष्ट्य! आपले बहुतेक शेजारी देश, युरोप मधील अनेक राष्ट्रे आज राजकीय, आर्थिक आणि अंतर्गत समाजविघातक कृतींनी त्रस्त झालेले आहेत. भारताच्या लोकसंख्येचे सरासरी वय ३० पेक्षा कमी आहे...म्हणजेच भारत हा जगातील सर्वात तरुण देशांत मोडतो. अंगभूत कौशल्य आणि अभिनवता हे गुण आपल्या युवा पिढीत आहेत. असेल त्या परिस्थितीला भिडून प्रगती साधणे, हा गुण आपल्या रक्तात भिनलेला आहे. आपल्या उज्ज्वल भविष्याचे हे एक मुख्य कारण आहे. म्हणूनच नवभारताच्या उभारणीत मुथ्थुकुमार सारख्या युवकांवर भिस्त असणार आहे.

वरती उल्लेख केल्याप्रमाणे विपरीत परिस्थितीशी आपण इतके सहज जुळवून घेतो...याचे एक उदाहरण द्यावेसे वाटते. साधारण ३५ वर्षांपूर्वीची ही गोष्ट! अमेरिकेत एका कॉन्फरन्स मध्ये हजेरी लावून भारतात एक भारतीय शास्त्रज्ञ परत येत होते. विमानात त्यांच्या शेजारी एक परदेशी व्यक्ती बसलेली होती. दूरचा, मोठ्या कालावधीचा प्रवास. त्यामुळे सहज गप्पा सुरु झाल्या. बराच वेळ गेला. मग त्याने या शास्त्रज्ञ भारतीयाला प्रश्न विचारला – ''तुम्ही भारतीय कोणत्याही परिस्थतीत इतके शांत कसे काय राहू शकता? तुमच्या लवचिकतेचे रहस्य काय, हे मला जाणून घ्यायची इच्छा आहे" त्यावर आपल्या शास्त्रज्ञ महाशयांनी दिलेले उत्तर खूप लक्षणीय आहे. ते म्हणाले – ''असं बघा, आमचा बुद्धिमान अभियंता विमानातून उतरतो... तेथून रेल्वेने तो जिल्ह्याच्या ठिकाणी पोहचतो. तिथून एस. टी. चा प्रवास करून तो तालुकाच्या ठिकाणी जातो... आणि पुढे बैलगाडीने त्याच्या गावी जातो!" हे उत्तर ऐकून तो परदेशी इसम नुसता 'आ' वासून बघत राहिला !

या गोष्टीतले ते शास्त्रज्ञ म्हणजे 'अग्निपंख' हे पुस्तक लिहिणारे आपले आदरणीय ए पी जे अब्दुल कलाम ! उद्याचा भारत घडवताना आपल्याला मुथ्थुकुमारसारख्या झपाटून जगणाऱ्या युवा पिढीची नितांत आवश्यकता आहे. आपली 'सार्थक' ही संस्थासुद्धा शेकडो गरजू युवक मित्र–मैत्रिणींना घडविण्यासाठी झटणारी एक संस्था आहे. आपण सगळे 'मेंटरींग' या उपक्रमातील शिलेदार आहोत. मित्रांनो, 'सार्थक'च्या अथक वाटचालीचे आपण सगळे साक्षीदार आहोत. याचा प्रत्येकाला सार्थ अभिमान आहे.

चला तर, आपण सार्थकचे सर्व मेंटी मिळून आपल्या संस्थेचे नाव सार्थ करण्याची प्रतिज्ञा घेऊया. नवभारत उभारणीत आपला सकारात्मक आणि समर्थ सहभाग नोंदवुया... आपला प्रत्येक मेंटी स्वत:ला सिद्ध करत पुढच्या पिढ्यांसमोर आपला उत्तुंग आदर्श ठेवेल... आपला प्रत्येक मेंटी 'सार्थक' ने पाहिलेले हे स्वप्न सत्यात उतरवेल, ही खात्री ! सार्थक मधील सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

शेखर जोशी –
shekharjoshi1958@gmail.com
Mob.: 9834769875





"Take up one idea. Make that one idea your life – think of it, dream of it, live on that idea. Let the brain, muscles, nerves, every part of your body, be full of that idea, and just leave every other idea alone. This is the way to success."

**~ Swami Vivekananda**

४

# चंद्रयान-३

## कु. हर्षदा सयाजी कामठे

SARTHAK
WELFARE FOUNDATION



"अगर किसी चीज को शिद्दत से चाहो तो पुरी कायनात तुम्हें उसे मिलाने में जूड जाती है !"

तुम्ही विचार करत असाल ही शाहरुख खानचं काय सांगतेय , छे हो..मी तर इच्छाशक्ती बद्दल बोलतेय. इयत्ता चौथीमध्ये ग्रह, तारे ,सूर्यमाला, चंद्र, पृथ्वी यांच्याशी ओळख झाली आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचं नाव काय ? या प्रश्नासोबत इस्त्रोचीही ओळख झाली. सॅटेलाईट्स आणि टेलिस्कोप अशा बऱ्याच संज्ञा जेव्हा समजू लागल्या... तेव्हा समजलं, आपलं इस्त्रो किती मोठं आहे.

आमची जनरेशन मला नेहमीच भाग्यवान वाटते, चंद्रयान, चंद्रयान २, मंगळावर पहिल्याच प्रयत्नात जाणारा भारत, आणि आता चंद्रयान–३ असे ऐतिहासिक क्षण आपण अनुभवतोय. उद्याच्या पिढीला पुस्तकात असणारे धडे आपण आज जगतोय ही जाणीवच किती सुंदर आहे ना ? २००८ मध्ये चंद्रयान १ चं यशस्वी प्रक्षेपण श्रीहरीकोटाहून करण्यात आलेलं. चंद्रावर पाणी असल्याचा शोध लावला तोही या चंद्रयान–१ ने ! फारशी समज नव्हती तेव्हा त्यामुळे जेव्हा २०१३ मध्ये मार्स ऑर्बिटर मिशन म्हणजेच मंगळावर जाण्यासाठी भारत सज्ज झालेला.. तेव्हा इस्त्रोचा इतिहास मी आवडीने वाचून काढला. या दैदिप्यमान यशानंतर भारताला स्पेस सायन्समध्ये वेगळ्याच उंचीवर जाताना मी पाहिलंय! त्यानंतर चंद्रयान– २ ची शोकांतिका ही पचवली. आणि चंद्रयान ३ ची तेव्हापासूनच वाट पाहणं सुरु झालं.

मे महिन्यात माझे पेपर सुरु असताना समजलं चंद्रयान–३ जुलै मध्ये लॉंच होईल.. तेव्हापासूनच या मिशनबद्दल हळूहळू

सगळी माहिती गोळा करत राहिले. पेलोड्स काय असतील, चंद्रयान–३ च्या मागे काय कारण आहे ? नविन टेक्नोलॉजी कोणती असेल ? चंद्रयान–२ नंतर नविन बदल काय असतील? आणि चंद्रयान–३ का ? कशासाठी ? या का चं उत्तर मला माझे ध्येय गाठण्यासाठी प्रेरित करेल याची मला कल्पनाच नव्हती. चंद्रयान १ च्या प्रक्षेपणामागे चंद्राचा अभ्यास करणं, त्यातही Chemical, Photo & geological आणि चंद्रावरच्या Mineralogy चा अभ्यास करणं हा उद्देश होता. मी माझं जे करियर घडवू पाहतेय त्यामध्ये मीही हाच अभ्यास करतेय! मिनरोलॉजी, रिमोट सेन्सिंग, फोटो जिओलॉजी! या एका गोष्टीने प्रेरणा दिलीय मला, प्लॅनेटरी सायन्स आणि भविष्यातील त्यातील संधी काहीशा प्रमाणात खुणावत आहेत मलाही!

फर्ग्युसनने या तीन वर्षांत खूप काही दिलंय.. त्यातील अविस्मरणीय अनुभव म्हणजे डॉ. सुरेश नाईक, इंटरनॅशनल स्पेस सोसायटीचे चेअरमन आणि इस्रोचे फॉर्मर ग्रुप डिरेक्टर यांचं गेस्ट लेक्चर! सरांना भेटण्याची संधी १३ जुलैला लाभली. फर्ग्यूसन महाविद्यालयातील ॲस्ट्रो क्लबने हा इव्हेंट ऑर्गनायझ केलेला. चंद्रयान –२ , आणि चंद्रयान–३ बद्दल सरांनी सविस्तर सांगितलं. गुगल बाबांनी दिलेली माहिती वाचणं आणि असं एका साइंटिस्टकडून ऐकणं.. अनुभव विलक्षण होता. आनंद होता, हुरहूर होती चंद्रयान–३ च्या प्रक्षेपणाबद्दल आणि त्याही पेक्षा जास्त Curiosity! दुसऱ्या दिवशी म्हणजेच १४ जुलैला कॉलेजमध्ये लाईफ प्रक्षेपण दाखवण्यात आलं. माझ्यासोबत माझ्यासारखेच शेकडो उत्साही लोक पाहून छान वाटलं. इस्त्रोच्या यशाकडे डोळे लावून पाहणारे सारे भारतीय आणि तो ऐतिहासिक क्षण! २ वाजून ३४ मिनिटांनी चंद्रयान– ३ चं यशस्वी प्रक्षेपण झालं आणि आम्ही जल्लोष केला! हा अनुभवही खास होता, आमचे प्रिन्सिपल सर, प्रोफेसर्स, माझे मित्र मैत्रीणी आणि उपस्थित सगळ्याच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद एक वेगळाच माहौल बनवून गेला. मी नेहमी बाबांकडून ऐकत आलेय की सचिन तेंडुलकर खेळायला मैदानात आला की कसे एकाच घरी जमलेले शेकडो लोकं तो सामना ऐकून जल्लोष करायचे ! आज स्पेस मिशन लॉंचिंगसाठी ही तोच उत्साह बघतेय तेव्हा वाटतं भारत बदलतोय! पहिल्याच रॉकेट चे पार्ट्स सायकलवर नेण्यापासून ते चंद्रयान–३ पर्यंत चा प्रवास कित्येक शास्त्रज्ञांच्या योगदानामुळे सफल झाला आहे. किती अफाट इच्छाशक्ती असेल नाही ? चंद्रयान–२ चं अपयश पचवून पुन्हा चंद्रयान–३ साठी सज्ज होणं!

यातून शिकण्यासारखं आहे ते म्हणजे प्रयत्न करत राहणं! अपयशाने खचून न जाता नव्या तयारीने पुन्हा प्रयत्न करणं! मीही करतेय... माझ्यापुढे असलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी प्रयत्न करतेय... मुळातच अडचणी येतात त्या आपल्याला आणखी शक्तिशाली बनवण्यासाठी पण स्वत:वर विश्वास, इच्छाशक्ती आणि प्रयत्न करत राहणं नक्कीच यशापर्यंत पोचवेल असं मला वाटतं. बाकी २३ ऑगस्टला होणाऱ्या चंद्रयान–३ च्या यशस्वी लॅंडींग ची वाट पाहते आहे... आणि तुम्ही ?

कु. हर्षदा सयाजी कामठे
जेजुरी विभाग,
सार्थक फाउंडेशन
T.Y. Bsc Geology
Fergusson College, Pune.



आप तब तक लडना मत छोडो जब तक कि आप अपनी तय की हुई जगह पर ना पहुंच जाओ। यही एक बात है जो आपको विशेष बनाती है – जिंदगी में एक लक्ष्य बनाओ, लगातार ज्ञान प्राप्त करो, कडी मेहनत करो और महान जीवन को प्राप्त करने के लिए हमेशा दृढ–विश्वास रखो।

**– ए. पी. जे. अब्दुल कलाम**

# ५ सार्थक - एक वारी शिक्षणाची

SARTHAK WELFARE FOUNDATION

## सौ. मयुरी मिलिंद रोकडे




समविचारी माणसे ही जगाच्या पाठीवर कुठेही असली तरी ती वैचारिक साधर्म्यामुळे कुठे ना कुठेतरी एकत्र येतातच असाच काहीसा अनुभव हा माझ्या बाबतीतला आहे.

आपल्या सार्थकच्या डायरेक्टर आणि ज्यांना प्रेमाने मी माझी मोठी ताई असे संबोधते अशा स्वातीताई नामजोशी आमच्या सोसायटीत राहायला आल्या. त्यावेळचा काळ हा लॉकडाऊनचा होता. लॉकडाऊनच्या निमित्ताने आमच्या सोसायटीची श्वास नावाची मेडिकल टीम आम्ही स्वातीताई यांच्यामुळे तयार केली लॉकडाऊनच्या काळात रुग्णाला हॉस्पिटलचे नाव सुचवून तिथे प्रवेश मिळवून देण्यापर्यंत ते औषधोपचार यांची नावे समजून सांगण्यापर्यंतची ही स्वेच्छेनी उभारण्यात आलेली टीम. आपल्या सोसायटीतील मदत करणाऱ्या गरजू कामगार भगिनी मावशी यांना विटामिनयुक्त औषध त्या काळात मोफत मिळवून देणं किंवा स्वखर्चाने ती त्यांना देणं यासाठी पुढाकार घेऊन कार्यरत असलेली ही आमची टीम आणि तिथेच माझा आणि स्वातीताई यांचा परिचय झाला. परिचयाचे रूपांतर मैत्रीत झालं आणि या मैत्रीच्या माध्यमातूनच स्वातीताई चालवत असलेल्या सार्थक वेल्फेअर फाउंडेशन या एनजीओची मला त्यांच्याकडूनच माहिती मिळाली आणि त्यांनी मला विचारलं की एनजीओत तुला असलेल्या ज्ञानाचा वापर व्हावा म्हणून काम करणार का? होकारार्थी माझी मान हालली आणि सार्थकशी साधारणतः दोन वर्षांपूर्वी मी जोडले गेले. सार्थक संस्थेचा हेतू सार्थक संस्थेची ध्येये उद्दिष्टे यांची माहिती मला वेळोवेळी स्वातीताई कडून आणि त्याचप्रमाणे सार्थकने वेळोवेळी आयोजित केलेल्या वेगवेगळ्या चर्चासत्रातून वर्कशॉपच्या माध्यमातून मला मिळाली.

सर्वसामान्य लोकांमध्ये बऱ्याच वेळेला छान गोष्टी करण्याची, समाजासाठी काहीतरी भरीव करण्याची इच्छा असते, तळमळ असते परंतु आर्थिक बाबींमुळे आणि योग्य त्या संस्थेशी अथवा व्यक्तींशी जोडले न गेल्यामुळे हे स्वप्न हवेत विरल्याचे आपल्याला पाहायला मिळते. परंतु सार्थकशी मी जोडले गेल्यानंतर मला स्वतःकडील ज्ञानाचा वापर इतरांच्या जडणघडणीत दिशादर्शक म्हणून करायचा आहे ही संकल्पनाच खूप मनापासून आवडली. आवडीच्या गोष्टी आणि द्यायला लागणारा वेळ याची सांगड जमल्यानंतर सर्वप्रथम मी मेंटोर आणि मेंटोरिंग याची व्याप्ती समजावून घेतली. मी शारीरिक शिक्षण शास्त्राची मास्टर डिग्री घेतलेली असल्याने आपल्याकडील शारीरिक शिक्षण ज्ञानाचा अनुभव, त्याचे फायदे मला देण्यात येणाऱ्या मेंटीला शेअर करण्यासाठी मी खूपच उत्सुक होते. आणि ही संधी वर्षभरापूर्वी चालून आली ती कु.गीतांजली ढोबे या माझ्या दृष्टीहीन असलेल्या मेंटीच्या माध्यमातून.

"A mentor is someone who allows you to see the hope inside yourself "

......By Oprah Winfrey

प्रसिद्ध अमेरिकन अभिनेत्री आणि लेखिका ओप्रह विन्फ्रे यांची मेंटोरीगची संकल्पना डोक्यात ठेवून वर्षभरापूर्वी माझ्या जीवनातल्या नवीन अध्यायाची आणि गीता बरोबरच्या नवीन प्रवासाची सुरुवात झाली आणि मला जाणीव झाली ती Mentoring is an unconditional acceptance of a student while guiding them on the path of growth and development या वाक्याची.

कु. गीतांजली ढोबे( दृष्टीहीन) ही माझी मेंटी माझ्याकडे आली तेव्हा तीने नुकतीच दहावी होऊन ११ वीला बीएमसीसीला ऍडमिशन घेतलेली. दिव्यदृष्टी असलेल्या गीताला शिक्षणाप्रमाणे खेळाची ही प्रचंड आवड आहे. ती आली आणि तिने जिंकलं.... असाच काहीसा अनुभव मला गीताच्या बाबतीत सांगायला आवडेल. सर्वप्रथम गीता मला भेटली ती सार्थकच्या वर्धापन दिनानिमित्त घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाला आणि इथून पुढे आमच्या प्रवासाचा श्रीगणेशा झाला. मी स्विमिंग कोच म्हणून काम करत असताना आणि संच या स्पेशल मुलांशी निगडित असलेल्या संस्थेत काम करत असतानाचा या मुलांना शिकवण्याचा अनुभव मला गीता बरोबर वाटचाल करताना उपयोगी पडला.

गीताबरोबर अनेक वेळा बोलून आणि भेटून मला एक गोष्ट सदैव जाणवली ती म्हणजे गीताकडे कोणतीही नवीन गोष्ट शिकण्यासाठी असलेली तळमळ आणि त्यासाठी मेहनत करण्याची वृत्तीही मला खूपच भावली. गीताला शिक्षणाप्रमाणे व्यायामाची पण प्रचंड आवड आहे कराटे जुदो, विशेष करून बुद्धिबळ हे तिच्या आवडीचे खेळ आहेत. तिने या खेळांमध्ये विशेष प्राविण्य देखील मिळवले आहे ती बुद्धिबळाची राज्यस्तरीय खेळाडू आहे त्याचप्रमाणे ती जुदो आणि कराटे मध्ये देखील राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर चमकली आहे. यासाठी तिचे अनेक ठिकाणी गौरव झालेले आहेत. तिच्या लाघवी स्वभावामुळे तिने खूप मोठा मित्रपरिवार जमवला आहे. आधुनिक तंत्रज्ञान शिकून घेऊन भविष्यात तिला स्वत:च्या पायावर उभे राहून स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करायचे आहे ही जाणीव कायम मला तिच्या बोलण्यातून जाणवते. खरंतर गीताच्या वयाच्या मुलांमध्ये सभोवतालच्या परिस्थितीची, आपल्या घरातील आई–वडिलांना असणाऱ्या आर्थिक विवंचनेची, कष्टाची जाणीव फार क्वचितच पाहायला मिळते. परंतु गीता या गोष्टीला अपवाद आहे. आपली आई वडील , भाऊ, आजूबाजूचा मित्रपरिवार, शिक्षक, मार्गदर्शक हे आपल्यासाठी जास्त कष्ट घेतात याची जाणीव या वयात तिला आहे. खरंतर आपल्या आई–वडिलांकडे हट्ट करण्याचं वय, पाहिजे ती गोष्ट मागून घेण्याचे वय, हवे ते लाड पुरवून घेण्याचे वय पण या वयात तिच्या अंगी असलेली समजूतदारपणाची समजही तिच्याशी बोलत असताना खूप काही गोष्टी सांगून जाते. गीताला आई वडील आणि भाऊ असा परिवार आहे त्यापैकी आई छोटी मोठी कामे करून मिळणाऱ्या तुटपुंज्या कमाईतून आपल्या संसाराला हातभार लावत आहे तर गीताचे वडील हे ऐकू आणि बोलू शकत नाहीत. गीताला आपल्या भविष्याबद्दल खूप चिंता वाटते आणि त्यासाठी तिला खूप शिकून मोठे व्हायचे आहे स्वत:च्या पायावर उभे राहून आई–वडिलांना चांगले दिवस दाखवायचे आहेत हे तिच्या बोलण्यातून मला वारंवार जाणवते.

जेथे दिव्यत्वाची येते प्रचिती
तेथे कर माझे जुळती.

या उक्तीची प्रचिती मला सार्थकच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. आज गीताचे शैक्षणिक पालकत्व सार्थकने स्वीकारल्यामुळे आणि तिच्या सुखदु:खात खंबीरपणे तिच्या पाठीशी उभे राहिल्यामुळे आज गीता ज्या आत्मविश्वासाने समाजात वावरत आहे आणि छान कामगिरी करत आहे त्याचे सर्व श्रेय हे निश्चितच सार्थकला जाते. आज सार्थक वेल्फेअर फाउंडेशनने गीता आणि गीता सारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आर्थिक विवंचनेमुळे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवून, मानसिक स्थैर्य प्रस्थापित करून पुढील सुखद आयुष्याची स्वप्न पाहण्यासाठी आणि त्यांना त्यांचे पंख हलवून गरुडझेप घेण्याची ताकद दिली आहे. या चांगल्या कामासाठी मी सार्थक वेल्फेअर फाउंडेशनशी जोडले गेल्याचा मला प्रचंड अभिमान वाटत आहे. सार्थकच्या शैक्षणिक वारीचा हा नंदादीप असाच सदैव तेवत राहू दे. सार्थकच्या पुढील वाटचालीसाठी माझ्याकडून खूप खूप मनापासून शुभेच्छा ! धन्यवाद !!

**सौ. मयुरी मिलिंद रोकडे**
**मेंटोर – सार्थक वेल्फेअर फाउंडेशन कोथरूड पुणे**



६

# सुरुवात एका आशेची!!!

## मेघाली राजे, मंजिरी टकले

SARTHAK WELFARE FOUNDATION



आपल्याला आयुष्याबद्दलची समज किती असते ? ती येते लिमिटेड अनुभवातून, ऐकलेल्या गोष्टींमधून, TV वरच्या बातम्या पाहून आणि वाचून. पण खऱ्या आयुष्याची समज, त्याची खोली, त्याचा कॅनव्हास किती मोठा आहे हे कधी कधी आपल्याला अचानक उमगतं. असचं काहीसं आमच्या बाबतीत झालं आणि हा अनुभव आम्ही घेतला तो काही orphanages मधून !!

अतिशय लहान वयात आलेले विदारक अनुभव , नात्यांवरचा विश्वास उडावा अशी परिस्थिती, समाजाचे वेगळेच रूप – हे आम्ही तिथे अनुभवले आणि हे अनुभवल्यानंतर आम्हाला काही प्रश्न पडले खरंच आपण माणूस म्हणून समोरच्या व्यक्तीचा किती विचार करतो ? प्रगत समाजाचे मोजमाप काय असते ? एकीकडे भरपूर पगार, social media वापरणाऱ्या लोकांची वाढती संख्या, मोठमोठ्या मॉल्सचे वाढते प्रमाण त्याप्रमाणे समाजात दुर्लक्षित मुलांची वाढती संख्या. हे कशाचे द्योतक आहे ?

हे आणि असेच काही प्रश्न आम्ही सार्थक फौंडेशन व KTFL यांच्या orphanages च्या प्रोजेक्ट मधून सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत. दुर्लक्षित घटकांबरोबर काम करणाऱ्या संस्था आणि त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या सामाजिक संस्था यांचं समाजात असलेलं महत्त्व आणि गरज हे प्रकर्षाने जाणवत आहे. निरोगी आणि सुदृढ समाज राहण्यासाठी हे किती आवश्यक आहे याची अनुभूती आम्ही घेत आहोत. मुलींना त्यांना आलेल्या अनुभवांबरोबर राहणं निश्चित त्रासदायक असतं पण त्यांच्या बरोबर सार्थकतर्फे संवाद साधायला लागलो तेंव्हा त्यांची हळूहळू होणारी प्रगती ही मुलींना स्वत: ला जाणवायला लागली. आमच्याकरता समाधानाची बाब होती ही. सुरवातीला अनोळखी असणाऱ्या मुलीबरोबर सेशन घेता घेता फार काही व्यक्त न होणाऱ्या मुली मोकळेपणाने आणि आत्मविश्वासाने आपले विचार मांडायला लागल्या आहेत हे बघून आमच्या श्रमाचे चीज होते आहे असे वाटते. हा मुली आणि सार्थक यांचा प्रवास मोठा आहे पण एकेक टप्पा आम्ही स्वाती नामजोशी व मृणाल राजहंस यांच्या मार्गदर्शनाखाली पार करू याचा विश्वास आम्हाला वाटतो. आणि म्हणावेसे वाटते

"Life imposes things on you that you can*t control but you still have the choice of how you are going to live through this."

मेघाली राजे, मंजिरी टकले
Counsellor Project Vidya

७

# तिमिरातुनी तेजाकडे...

**संध्या पाटील**

SARTHAK
WELFARE FOUNDATION

ऑक्टोंबर महिन्यात दिवाळीच्या आधी, अनाथाश्रमातील मुलींच्या  मुलाखती झाल्या, त्यानंतर त्यांची स्कॉलरशिप साठी निवड झाली. आम्ही १५/१/२०२३ पासून या प्रोजेक्टवर समुपदेशक व ट्रेनर म्हणून काम करू लागलो. माझ्याकडे ममता बाल सदन सासवड व वडगाव शेरी माहेर येथील मुली आहेत. प्रत्येक मुलीची एक कहाणी आहे, जी ऐकून आपण हेलावून जातो, पण या मुलींशी बोलल्यानंतर त्यांच्यामध्ये मिसळल्यानंतर त्या कोणत्या प्रतिकूल परिस्थितीत झुंजत होत्या हे लक्षात येतं आणि त्यांच्या जिद्दीला सलाम करावा वाटतो,

आमच्यासमोर अशा मुलींबरोबर काम करणं हे एक आव्हानच होतं, कारण आत्तापर्यंत आम्ही जे काम करत होतो तेथील मुला मुलींचे प्रश्न हे अतिशय वेगळ्या स्वरूपाचे आहेत, व या मुलींचे प्रश्न हे खूप वेगळे आहेत, या मुलींना बोलते करणे, याबद्दल विश्वास निर्माण करणे, त्यांच्या भावना समजून घेणे, समुपदेशक म्हणून आमच्यात व त्यांच्यामध्ये एक विश्वासार्ह नाते निर्माण करणे, असे आव्हानात्मक काम होते, म्हणूनच आम्ही सुरुवातीला प्रत्येक सेशनची वेगळी आखणी केली, त्यामध्ये ऍक्टिव्हिटीज, काही गेम्स, व त्यांची स्वत:बद्दलची असणारे स्वप्न, ते पूर्ण करण्यासाठी काय काय करावे लागेल, त्यांना स्वत:ची जाणीव करून देणे, अशा प्रकारचे सत्रांचे नियोजन केले, व या सत्रांमध्ये मुलींनी अतिशय सुंदर रीतीने पार्टिसिपेट केले, त्यांचा खेळामधला सहभाग उस्फूर्त होता, चर्चा व ऍक्टिव्हिटीज मध्ये त्या खूप छान संवाद साधू लागल्या, मनातील काही भावना त्यांनी कधी कधी शब्दांमधून व्यक्त केले, तर कधी ड्रॉइंगच्या रूपाने त्यांनी ते व्यक्त केले, अशाप्रकारे मुलींबरोबर आता आम्ही एक छान बॉण्ड तयार केला आहे. असे आम्ही आत्तापर्यंत तीन सेशन घेतले आहेत,

त्यानंतर आम्ही प्रत्येक मुलीची वैयक्तिक सेशन घेतो, यामध्ये त्यांचे करियर विषयक प्रश्न, त्यांच्या मनातील असणाऱ्या काही शंका, क्लास लावला असेल किंवा लावायचा असेल त्याबद्दलची चर्चा यावर बोलले जाते, आता मुली अतिशय छान प्रकारे त्याचे प्रश्न मांडत असतात व मनमोकळा संवाद साधत आहेत, आमची सेशन त्यांना आवडत आहेत असे त्यांच्या फीडबॅक वरून व त्यांचा त्यांच्या प्रत्येक गोष्टीवर होणारा बदल, सेशनमधील सहभाग यावरून दिसून येत आहे. या कामाकडे एक चॅलेंज म्हणून पाहिले होते, व ते चॅलेंज मुलींमधील सकारात्मक बदलावरून व मनमोकळ्या संवादावरून काही अंशाने आम्ही त्यात यशस्वी झालो असे वाटत आहे.

**Counsellor  Sandhya Patil**
Project Vidya

सबसे उत्तम कार्य क्या होता है? – किसी इंसान के दिल को खुश करना, किसी भूखे को खाना खिलाना, जरूरतमंदो की मदद करना, किसी दुखियारे का दुख दूर करना, किसी घायल की सेवा करना आदि ।

**– ए. पी. जे. अब्दुल कलाम**

८

# प्रोजेक्ट शिक्षा....

## घे भरारी....!

करुणा मोरे, अर्चना जोशी

SARTHAK WELFARE FOUNDATION

असे जगावे दुनियेमध्ये आव्हानाचे लावून अत्तर!
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर!

विंदा करंदीकर यांच्या या कवितेप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यामध्ये ओपस रुरल फाउंडेशन आणि आम्ही गेले दोन वर्ष काम करत आहोत.
तिथली आमची मुलं मुली ही या कवितेतील सारखीच आयुष्याला उत्तर देण्यासाठी तयार होत आहेत. घरामधल्या असलेल्या आर्थिक परिस्थितीवर मात करत आलेल्या संकटांना तोंड देत, सर्वांच्या सहकार्याने ते स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

प्रोजेक्ट शिक्षाची २०२१-२०२२, २०२२-२०२३ ची बॅच यशस्वीरित्या शैक्षणिक वर्षात प्रगती करत आहे. यावर्षी देखील तिसऱ्या बॅचच्या मुला मुलींची निवड झालेली आहे. सार्थक वेल्फेअर फाउंडेशन व ओपस रूरल फाउंडेशन हे एक कुटुंब प्रमुख म्हणून या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत आहे.

या मुलांच्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी मुलांच्या फक्त शैक्षणिक प्रगती पुरताच विचार न करता त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, यासाठी जीवन कौशल्याचे धडेही मुलांना द्यावे लागतात. या मुलांसोबत स्व जाणीव, स्व विकास, आत्मविश्वासाच्या जोरावर येणाऱ्या संकटांना कसे सामोरे जावे, कोणतेही प्रश्न हाताळताना कशी काळजी घ्यावी, ग्रामीण, दुर्गम भाग असल्याकारणामुळे क्लासेसची सोय नाही, ही गैरसोय पाहता, मुला मुलींसाठी इंग्रजी या विषयात प्राविण्य मिळवावे म्हणून इंग्रजी विषयाचे क्लास सुरू करण्यात आले.

पहिल्या बॅचच्या मुला मुलींनी या वर्षी बारावी मध्ये उत्तम यश संपादन केलेले आहे. त्यांना पुढील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी करिअर मार्गदर्शन यासारखे सत्रे आयोजित करण्यात आली. पुढे भविष्यात मुलाखत कशी द्यावी ,संवाद कसा साधावा, येणाऱ्या ताणाचे व्यवस्थापन कसे करावे, आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी या सारख्या व अशा अनेक विषयांवर सेशन आयोजित केली जातात. मुलांना पडणाऱ्या प्रश्नांसाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशक त्यांच्या संपर्कात नेहमीच असतात.

घरामधील आर्थिक परिस्थिती, आजारपण असो किंवा अचानक येणारी संकटे असो या सगळ्या गोष्टींना आमच्या मदतीने आमची मुले तोंड द्यायला तयार झालेली आहेत. येणारा प्रत्येक प्रश्न हा कसा सोडवायचा आणि त्यातून कसा मार्ग काढायचा यासुद्धा गोष्टी ते शिकत आहेत स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी कुठलेही कष्ट घेण्याची त्यांची तयारी आहे.
''असे दांडगी इच्छा ज्याची मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर.''
अशी इच्छाशक्ती आणि यश मिळवण्यासाठी कोणतेही कष्ट करण्याची तयारी हे आम्ही या मुलांकडून शिकतो त्यांच्या या प्रयत्नांना आणि खडतर प्रवासाला आमचा सलाम!



करुणा मोरे, अर्चना जोशी.
समुपदेशक : प्रोजेक्ट शिक्षा.

९

# वाटचाल समृद्धीची

## संध्या पाटील

आपल्या प्रोजेक्ट ''लक्ष''मधील समृध्दी काळे ही विद्यार्थीनी अतिशय होतकरू, हुशार, सर्वांशी मिळून मिसळून वागणारी आणि बोलणारी अशी ही सर्वगुणसंपन्न ''समृद्धी.''

समृध्दी काळे ही राजगुरूनगर मधील लहानशा खेड्यातील रेटवडी गावात राहणारी मुलगी. ती लहानपणापासून हुशार व गुणवान आहे. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग घेण्याची वृत्ती आणि येईल ते आव्हान पेलण्याची तिच्यात असलेली ताकद, क्षमता खूपच आहे. तिची घरची परिस्थिती कशीही असली तरी अभ्यासाकडे तिचे कधीही दुर्लक्ष झालेले नाही. आई–वडील दोघेही शेतकरी कुटुंबातील आहेत. त्यांच्यासोबत शेतात कष्ट करून आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर आजपर्यंत ती चालत आली असून ती इथपर्यंत येऊन पोहोचली आहे.

पहिलीपासून ते आत्तापर्यतच्या शैक्षणिक वर्षांमध्ये प्रथम क्रमांक कायम ठेवणारी समृद्धी ही एक हुशार मुलगी आहे. एक माणुसकी जपणारी मुलगी अशी तिची वृत्ती आहे. अभ्यासांप्रमाणे तिने विविध कला व क्रिडा उदा. नाचणे (नृत्यकला), धावणे, कबड्डी खेळणे, खो–खो खेळणे, लंगडी घालणे या अशा अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन विविध पारितोषिके तिने पटकावली आहेत. तिचा खास आवडीचा छंद म्हणजे कविता लिहीणे, लेख लिहीणे, चारोळ्या लिहीणे, पुस्तके वाचन करणे ! हे तिच्यातील गुण तिच्या पालकांनी हेरले आणि शिक्षक व पालक यांनी मिळून समृद्धीचे ''कवितेचे चांदणे'' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकासाठी तिला भरपूर पारितोषिकेही मिळालेली आहेत. एवढ्या कमी वयात अशी गगनझेप तिने घेतली आहे. याचे कौतुक समाजातील सर्वच स्तरांतील लोकांनी भरभरून केलेले आहे.

समाजासाठी आपला काहीतरी हातभार लागला पाहिजे म्हणून ती एका संस्थेशी जोडली गेली आहे, ज्यात मुलींचे वेगवेगळे प्रश्न तसेच स्त्री–पुरुष समानता व असे बरेच समाजहिताचे प्रश्न घेऊन ती आत्तापासून समाजासाठी काम करत आहे. तसेच ती स्वत: एक चांगली मोटीव्हेटरदेखील आहे. तिला इतर शाळांमध्ये व्याख्यान देणेसाठी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावण्यात येते. यामध्येही ती पारंगत आहे. जवळजवळ सगळ्याच क्षेत्रांमध्ये तिने नावलौकिक मिळवला आहे. खेळ, भजनस्पर्धा, नाटकांतील मुख्य भूमिका, विविध स्पर्धा परीक्षा, सामान्य ज्ञान स्पर्धा या अशा प्रकारच्या सर्वच स्पर्धांमध्ये तिने उत्तुंग यश संपादन केले आहे. या सर्व गोष्टीबरोबर अभ्यासांतदेखील तिची प्रगती वाखाणण्याजोगी आहे. इयत्ता १० वी ला शाळेमध्ये तिने प्रथम क्रमांक पटकावून आई वडिलांची मान उंचावली आहे. आत्ता ती प्रोजेक्ट ''लक्ष'' मध्ये जोडली गेली आहे आणि तिला मिळत असलेल्या शिष्यवृत्तीचा ती योग्य प्रकारे उपयोग करून घेत आहे. तिला मोठं होवून एक कर्तृत्ववान व उत्कृष्ट इंजिनीअर बनायचं आहे आणि त्यासाठी त्या दिशेने तिची आगेकूच सुरू आहे.

मोठी स्वप्न, मोठ्या आकांक्षा मनी बाळगून ती तीच्या वाटेतील अडथळे बाजूला करून जीवनाची यशस्वी वाटचाल करत पुढे जात आहे. तिला असंदेखील वाटतय की जसे आज आपल्याला कोणीतरी मदतीचा हात देतेय तसेच आपण देखील पुढे जाऊन कोणासाठी तरी मदतीचा हात बनलं पाहिजे म्हणजे आपल्यासारख्या मुलींना त्यांना आवड असलेल्या क्षेत्रात जाण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.

मी तिची कौन्सिलर म्हणून काम करताना तिच्या मनातल्या शंकांना आणि तिच्या प्रश्नांना उत्तर देताना तसेच दुसऱ्या मुलींबद्दल असणारी तिची कळकळ जाणून घेताना खूप छान वाटले. अशा समृद्धी काळेसारख्या मुलीकडून मलाही खूप काही शिकायला मिळाले.

संध्या पाटील,
कौन्सिलर, सार्थक वेल्फेअर फौंडेशन, पुणे.
प्रोजेक्ट ''लक्ष.'' मो. +९१८२७५२६८१६४.

१०

# स्वप्न मानसीचे!

## मानसी ढमाले. - प्रोजेक्ट लक्ष्य ..

**करुणा मोरे**

SARTHAK
WELFARE FOUNDATION

मानसी ढमाले ही राजगुरुनगर तालुक्यातील कडूस या छोट्याश्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलगी आहे. मानसीने इयत्ता पहिली पासून ते आतापर्यंत तिच्या हुशारीच्या व तल्लख बुद्धीच्या जोरावर समाजासमोर एक वेगळीच प्रतिमा तयार केली आहे. ती electrical engineering मध्ये Diploma करत आहे.

मानसी शिक्षणासोबत इतर स्पर्धामध्ये कायम अव्वल क्रमांकावर राहिली आहे, तिला निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा खूप आवडतात व त्यात जिल्हा व राज्य स्तरावर तिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.
स्पर्धा परीक्षेची तिला लहानपणापासून आवड आहे तिने प्रज्ञाशोध सारख्या कठीण परीक्षा मध्ये यश संपादन केले आहे. मानसी ही अतिशय गुणी आणि होतकरू मुलगी आहे. तिला समाजातील सर्व गोष्टींची खूप जवळून माहिती आहे, तिच्यात समाजासाठी काही तरी करण्याची भावना दिसून येते.

मानसी अनेक संस्थांबरोबर काम करत आहे. गावातील मुलींनाही ती त्यांच्या अडचणींमध्ये मदत करत असते. वेळप्रसंगी काही समस्या सोडविण्यासाठी इतर मुलींना बरोबर घेऊन पंचायत समितीमध्ये, ग्रामपंचायतीमध्ये जाऊन आपल्या समस्या, मागण्या त्यांच्यासमोर ठेवत असते.

मानसीची सर्वात उल्लेखनीय कामगिरी कोरोनासारख्या महामारीत सर्वांना बघायला मिळाली. ही छोटीशी मानसी कोरोना काळात संस्थेमार्फत गावोगावी फिरून जन–जागृती करत होती, कोरोनाविषयी व्याख्याने देत होती. लोक लस घेत नव्हते तेव्हा लसीकरणासाठी लोकांना माहिती देत होती तसेच पथनाट्य करत होती, जेणेकरून लोकांची भीती कमी होईल. अश्या छोट्याश्या वयात मानसी हिचे काम प्रशंसनीय आहे. तसेच आपल्या वडिलांसोबत फिरून घरोघरी कोरोना किट, किराणाचे वाटप करत होती. या मानसीबद्दल एवढेच वाटते की, छोट्याशा वयात मानसीने स्वत: सोबत आई वडिलांचे नाव उज्ज्वल केले आहे. पुढेही तिच्या हुशारीचा फायदा समाजाला असाच होवो. आणि तिचा प्रगतीचा आलेख असाच उंचावत राहो, आणि ती तिच्या बळावर आकाशात उंच झेप घेत राहो..!!!

प्रोजेक्ट लक्ष्य
समुपदेशक– करुणा मोरे

Educating girls isn't just good for the girls, it's good for all of us. The future of our world is only as bright as the future of our girls."

**- Michelle Obama,**
former First Lady of the US.

# ११ किर्तनातून उत्कर्ष !

## मोनाली सुकींदा नरुटे – प्रोजेक्ट विद्या



"असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास तुका म्हणे। संतश्रेष्ठ तुकारामांनी 'अभ्यास' म्हणजे काय, अभ्यास नेमका कसा करावा, हे या अभंगातून नेमकेपणानं सांगितलं आहे.

माझे नाव मोनाली सुकींदा नरुटे आहे. मी जेजुरी विभागातील असून २०१९ च्या बॅच ची विद्यार्थिनी आहे. सध्या नवसहैद्री कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये (E&tc) तिसऱ्या वर्षात शिकत आहे. इंजिनिअरिंगची पदवी घेऊन KTFL सारख्याच मोठ्या व चांगल्या कंपनीत रूजू व्हावे, स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभे राहून नाव कमवावे व आई वडिलांचे, घराण्याचे नाव मोठे करावे हेच माझेही स्वप्न आहे.

आमच्या घरात आम्ही आई बाबा भाऊ बहिण आणि आजी आजोबा असे सात जण मिळून राहतो. माझी बहिण मोठी आहे, पण ती सतत आजारी असते, ती सध्या ग्रॅज्युएशनच्या तिसऱ्या वर्षात शिकत आहे. आणि लहान भाऊ ११ वी सायन्स मध्ये आहे. आई शेतात कामाला जाते आणि बाबा सकाळ संध्याकाळ चहाची टपरी चालवतात.

आमच्या घरात आजीला देवाची खूप आवड होती आणि तिच्यामुळेच मलासुद्धा देवाची आवड निर्माण झाली. माझ्या घरातील सगळ्यांची इच्छा होती की या मुलीने कीर्तनकार व्हावे आणि माझी सुद्धा खूप इच्छा होती. माळ तशी ४ थी पासून घातली होती पण १० वी मध्ये असताना सद्गुरूंनी अनुग्रह दिला आणि जीवनाला एक नवीन दिशा मिळत गेली. कोरोनाच्या कालावधीमध्ये ऑनलाईन किर्तन शिबिरे या माध्यमातून गुरुवर्य ह.भ.प. प्रशांत महाराज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने शिकत गेले. तसेच मला पुढे खूप संधी मिळत गेली आणि मी त्या संधीचे सोने करत गेले, यामध्ये मला माझ्या कुटुंबाने खूप पाठिंबा दिला..

परिस्थिती बेताचीच आहे, पण घरातील सगळे जिद्दीने चिकाटीने काम करून मला शिकवतात आणि मीही तेवढ्यच जिद्दीने अभ्यास करते. इंजिनिअरिंगच्या बरोबरीने मला किर्तनाच्या माध्यमातून परमेश्वराची आणि जनमानसाची सेवा करायची संधी मिळाली... आणि दोन्ही गोष्टी माझ्या आवडीच्या आहेत.

सगळ्यात महत्वाचे म्हणजे या सगळ्या संघर्षाच्या प्रवासामध्ये मला KTFL आणि सार्थक फाउंडेशनच्या डायरेक्टर आदरणीय स्वाती मॅडम यांनी वेळोवेळी खूप मदत केली पण एवढं नक्कीच सांगू शकते की खूप काही नाही करू शकले तरी खारीचा वाटा का होईना म्हणून नक्की मुलींना शिक्षणात नक्की मदत करेल.

मोनाली नरुटे.
Project Vaidya

> माझा जन्म कुठे व्हावा, कोणत्या जाती धर्मात व्हावा, आई वडील कसे असावेत, हे माझ्या हाती नव्हते, त्यामुळे त्याबद्दल तक्रार करत बसण्याऐवजी मी निसर्गाने मला दिलेल्या क्षमतांचा सकारात्मक वापर करून माझे जीवन नक्कीच सुखी करू शकतो
>
> **–संत ज्ञानेश्वर**

१२

# पंखांना वेध आकाशाचे!

## प्रगती जकाते

SARTHAK WELFARE FOUNDATION

नमस्कार मी प्रगती जकाते, म. टा. बळ हवे पंखांना या महाराष्ट्र टाईम्सच्या उपक्रमातून सार्थक फाउंडेशनशी २०२० साली जोडले गेले. चांगल्या मार्क्सने १० वी उत्तीर्ण झाले होते. News anchor व्हायचंय इतकचं एक स्वप्न होतं पण गरज होती योग्य मार्गदर्शनाची भविष्याच्या दृष्टीने आपण घेतलेला निर्णय आणि निवडलेला मार्ग बरोबर आहे, आम्ही तुझ्या सोबत आहोत त्या आधाराची, जो मला गेल्या ४ वर्षात पदोपदी सार्थकच्या Team कडून मिळाला, त्यासाठी सर्वप्रथम धन्यवाद.



१० वी नंतर career च्या दृष्टीने मी खुप गोंधळलेल्या अवस्थेत होते. मला जे क्षेत्र करियर म्हणून निवडायचं होत त्याबद्दल माझ्या घरच्यांना काहीच फारशी कल्पना नव्हती, सार्थकची Aptitude Test झाली त्यानुसार Commerce आणि arts दोन्ही क्षेत्रात माझा कल दिसून आला. मॅडमने career बद्दल तेव्हा मला खुप छान मार्गदर्शन त्यांनी केलं. मी आर्टस् घेण्याचं ठरवल पण घरच्यांनी विरोध केला. इतके चांगले marks पाडून arts काय घेतेस असं म्हणाले. मला कळत नाही आज पण science ला first priority मग त्यानंतर commerce आणि काहीच नाही झालं तर आर्टस् घेतात ही समाजाची मानसिकता का आहे, समाजाच्या या मानसिकतेला मलाही सामोर जावं लागलं. खुप विचार करून मग मी शेवटी commerce ला admission घेतली. Commerce सुद्धा खुप आवडू लागल. १२ वी उत्तीर्ण झाले ८९ टक्के पडले. आता पुढे काय करायचं ते मात्र माझ ठरलेलं होतं. पण ह्या क्षेत्रातलं परफेक्ट guide करणार कोणी नव्हतं. Media हे क्षेत्र घरच्यांसाठी खुप वेगळ होत. बाबांनी मला हे क्षेत्र निवडण्यासाठी खुप विरोध केला. त्यांच्यात आणि माझ्यात तेव्हा थोडेसे वादही झाले, पण माझं ठरल होतं. मळलेल्या जुन्या वाटांवरून मला जायचं नाही, मला माझा मार्ग बनवायचाय "अवघड आहे माहीत होतं पण अशक्य नाही हे ही माहित होतं."

माझ्या बाबांना भीती होती ती ह्यापुर्वी आमच्या घरात झालेल्या एका घटनेची. मी १२ वर्षांची असताना माझ्या सख्ख्या मोठ्या बहिणीने study pressureमुळे आत्महत्या केली होती. त्यामुळे त्यांना वाटत होतं, ह्या क्षेत्रात आपल्या कुटुंबातलं कोणीच नाही, तुला काही जमलं नाही, अवघड गेलं तर समजावून सांगणारं घरातलं कोणी नाही, त्यात पत्रकारितेचे काम जबाबदारीचे आणि जोखीमचे असते. तू आपलं साधंस काहीतरी Bank मध्ये जॉब कर अस त्याच मत होत. पण मी त्यांना सांगितलं. आपल्या घरात यापूर्वी कोणी केलं नाही म्हणून मीही करायच नाही असं कसं, ठीक आहे आतापर्यंत कोणी नाही पण मी गेले तर पुढे ज्यांना या क्षेत्रात करियर करायचय त्यांना मी मागदर्शन करेल. पप्पा रागातच म्हणाले, कर तुला जे करायचय ते पण माझं ठरलं होतं, आवडत नसलेलं क्षेत्र घेऊन मला पुढे पश्चाताप नाही करत बसायचं, आणि मी घेतली admission Media ला. मी त्यांना करून दाखवणार. ते जेव्हा घरात बसून tv वर बातम्या देताना मला बघतील तेव्हा त्यांना माझा अभिमानच वाटेल. त्यासाठीचेच हे प्रयत्न!

पहिल्याच वर्षात मी 'थिट्रोन' आणि 'Bonsai Production

कडून फर्ग्यूसन कॉलेजकडून पुण्यातील अण्णाभाऊ साठे सभागृह, भरत रंगमंच, The Box, the base, MIT कॉलेजचा रंगमंच, आणि बालगंधर्व या नावाजलेल्या रंगभुमीवर १०– १२ नाटकांचे प्रयोग केले, पप्पांचा त्यालाही विरोध होता. रात्री उशिरापर्यंत Practice असल्याकारणानं ते चिडायचे पण बालगंधर्वच्या रंगमंचावर त्या दिवशी मला थियट्रोन कडून बक्षिस मिळताना बघुन त्यांचे डोळे पाणावले होते.

मी कॉलेजकडून त्यानंतर एक शार्ट फिल्म केली, त्यापूर्वीही मी इंद्रधनुष्य ही शॉर्ट फिल्म केली होती. असे सतत उपक्रम सुरूच असतात. यंदाच्या फिरोदिया करंडकमध्ये music Team मध्ये काम केले, त्यासाठी fergusson कॉलेजच्या सांस्कृतिक विभागाकडून पारितोषिकसुद्धा मिळाल. कॉलेजच्या विविध वक्तृत्व स्पर्धेत मी भाग घेत असते. कॉलेजतर्फे मी 'दिपरंग' हे स्वत:चं असं Newsletter काढलं. ज्याच्यासाठी मी Editor, Journalist, layout designer, Proof reader चं काम केलं. पत्रकारितेचा एका वेगळा अनुभव त्यातून मिळाला. कॉलेजच्या मंथन या magzine साठी मी वेगवेगळ्या विषयांवर लेख आणि कावेता लिहल्या. या दरम्यान मी गायनाचे प्रशिक्षण सुद्धा घेतले. आता मी शेजारच्या लहान मुलांचे गायनाचे क्लाससुद्धा घेते.

फर्ग्युसनकडून मी स्वररंग' ही स्पर्धा केली (वैयक्तिक गायन). आता सध्या मौनांतर करंडक ही स्पर्धा केली. मी लोकमत News paper कडून मार्केटिंग Department मध्ये 'लोकमत संस्कार आई बाबांचे' या Project वर work केल. यापुर्वी १२ नंतर मी Adv. D. D. Shaha यांच्याकडे Charity commissioner court मध्ये personal assistant म्हणून काम केले. आता मी माझ्या Media च्या study सोबतच externally टिळक महाराष्ट्र विद्यापीठमधुन B.COM करत आहे. Career साठी अजून एक option आणि commerce ची मुळातच एक आवड लागली हाती म्हणून तेही करत आहे. सोबतच ग्राफिक designing चा जगन्नाथ राठी कला center मधुन करत आहे.

या सर्वांसोबत प्रकाशपर्व या Digital News portal मध्ये Pune district representative या पदावर कार्यरत असून as reporter, content writer, म्हणून कामकाज पाहत आहे, अजुन खुप सारी स्वप्नं आहेत. आणि माझ्या पाठीशी ''मटा हेल्पलाइन –सार्थक टीम कायम सोबत आहे. माझ्या एका लेटरवर' सार्थक टीमने मला अभ्यासासाठी लॅपटॉप दिला त्यासाठी, धन्यवाद

प्रगती जकाते

Creativity is intelligence having fun.

**– Albert Einstein**

# १३ प्रोजेक्ट लक्ष्य - *Hum Honge Kamyab Ek Din!*

## अंजली पिटके



२०२२-२३ या वर्षात सार्थक वेलफेअर फाउंडेशनने, 'टेनेको क्लीन एअर इंडीया' या कंपनी च्या सहकार्याने २० मुलींची शैक्षणिक जबाबदारी घेण्याचे निश्चित केले.या साठी खेड–चाकण परिसरातील हुशार व गरजू मुली निवडण्याचे ठरविले. अर्थातच सार्थक टीमने या परिसरातील वेगवेगळ्या शाळांमधून हुशार पण बेताची आर्थिक परिस्थिती असलेल्या पण शिक्षणाची आस असलेल्या मुली मुलाखत, गृहभेट, Aptitude test इ. सर्व चाचण्या घेऊन त्या मधून २० मुलींची निवड केली.

आर्थिक मदतीबरोबरच मुलींच्या सर्वांगीण विकासाकरिता सार्थक टीमने त्यांच्यासाठी अभ्यास कौशल्य, जीवन कौशल्य, करिअर मार्गदर्शन यासारखी वेगवेगळी सत्रे महिन्यातून एकदा चाकण येथे आयोजित करते. सार्थकच्या समुपदेशक–मेंटोर संध्या पाटील आणि करुणा मोरे या टेलिफोनद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटून मुलींशी संवाद साधत आहेत.

मुलींनी त्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच वेगवेळ्या अनुभवांनी समृद्ध व्हावे या साठी 'टेनेको'ने त्यांच्या चाकण येथील प्लांटला मुलींसाठी २५ फेब्रुवारी २३ ला industry Visit चे आयोजन केले. घर–शेत–शाळा–कॉलेज या व्यतिरिक्त कधीही बाहेर न पडणाऱ्या मुलींसाठी ही भेट एक समृद्ध अनुभव देणारी ठरली. कंपनीतील सर्व टीमने त्यांचे आपुलकीने केलेल्या स्वागतामुळे मुलीनी ही भेट मोकळेपणाने अनुभवली. कंपनीमधील शिस्तीचे वातावरण, त्यांमध्ये काम करणारीमाणसे, वेगवेगळ्या यंत्राद्वारे चालणारी कामे, त्याकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान या सगळ्यांची माहिती त्यांना तिथे देण्यात आली. प्लांटमध्ये घेण्यात येणारी सुरक्षा या सगळ्या गोष्टी अनुभवल्या. टेनेकोच्या सर्व टीमने त्यांच्याशी प्रेमाने साधलेल्या संवादांनी मुली भारावून गेल्या. कंपनीतून बाहेर पडताना प्रत्येकीच्या मनात आपणही असेच मोठ्या कंपनीमध्ये यशस्वीपणे आपले करिअर घडवायचे असे 'लक्ष्य' तयार झाले.

तसेच जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने टेनेको क्लीन एअर इंडीयाच्या वतीने आणि महाराष्ट्र वनविभागाच्या सहकार्याने 'वृक्षारोपण अभियान' कार्यक्रमाचे आयोजन केले. या मध्ये टेनेकोचे सर्व पदाधिकारी, स्टाफ आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या बरोबरच सार्थकची टीम आणि प्रोजेक्ट लक्ष्य च्या मुली सहभागी झाल्या. कंपनीचे डायरेक्टर मा. रिशी वर्मा यांनी मुलींबरोबर संवाद साधला. त्यांना त्यांच्या यशस्वी करिअरकरिता महत्वाच्या, अनुभवाच्या काही गोष्टीही सांगितल्या. पावसाचा आनंद घेत सर्वांनी वृक्षारोपणाचा आनंद एकत्रितपणे अनुभवला.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षातही नवीन २० मुली प्रोजेक्ट लक्ष्य साठी निवडण्याची जबाबदारी सार्थक वर सोपविली आहे. अर्थातच सार्थकवर दाखवलेला हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सार्थक टीम अविरत प्रयत्न करत राहणार आहे.

अंजली पिटके
प्रोजेक्ट लक्ष्य

# १४ युवा स्पंदन

## आयुष्य

आयुष्य म्हणजे काय असत
सुख दु:खाच सार असत
प्रेमाने जपलेल्या माणसांची
प्रेमळ नाळ असत

आयुष्य म्हणजे हसवणारे
तर कधी रडवणारे क्षण
तर कधी कधी आपुलकीने
सगळ्यांना जपताना
भेटलेले प्रेमळ मन
आयुष्य म्हणजे प्रेमाने
वाहत जाणारा निर्मळ झरा
जो शिकवतो माणसाला
जगण्याचा अर्थ खरा
किंमत अन्नाची

पोटात अन्न असल्याशिवाय
ओढ जीवनाची लागत नाही
रिकाम्या पोटी अन्नाचा
वास घेऊन चालत नाही

पोटात अन्न असेल तर
जीवन कसं अगदी सुसह्य होतं
पोटात अन्न नसेल तर
वेदना मिळते जीवंतपणी मरणाची

ताटातल्या अन्नाचा आदर करा
कारण तेच अन्न तुम्हाला जगवतयं
आणि तुमच्या ताटातलं अन्न
कुणाला तरी उपाशी ठेवतयं

## व्याख्या स्त्री ची

स्त्रीचं असणं, नसणं दोन्ही सारखचं असतं
स्त्रीचं असणं, पणं स्त्री नसणं,दोन्ही सारखचं नसतं

स्त्रीचं स्त्री म्हणून वागवून घेणं सोपं असतं
पणं त्या स्त्रीला स्त्री म्हणूनी वागायला लावणं मात्र
कठीण असतं

स्त्रीं च्या गर्भात नऊ महिने राहणं सोपं असतं
पणं तेच स्त्रींच्या डोळयांनी बघितलेल्या नव्या
जन्माचं मोठं पर्व असतं

जरी स्त्रींला भातुकलीचा खेळ आवडला तरी
आकाशात उडणारं विमान मात्र तिला हवं असतं

सिद्धी रणपिसे

## उड़ान

परोंसे ना सही,
मेहनत से ही सही उड़ान
भरना चाहते हैं हम ।
शिद्दत से ही सही,
तारे पकडना चाहते हैं हम ।।

परिस्थिती हो विरूद्ध ही सही,
ढाल ना बनाकर पर
ढाल बनकर लढेंगे हम ।
पुस्तकों के पहाडोंसे ही सही,
जिंदगी सवारना चाहते हैं हम ।।

भलेही जिंदगीका हो सामना,
काटोंसे से ही सही,
बनकर खिलेंगे गुलाब हम वही ।
क्योंकी सिखाया गुरुओं ने
हमें कीचड ही हों सही,
पर खिलता किमती कमल ही वही ।।

ना हारेंगे हम, ना डरेंगे हम,
क्योकी सिखायां शिक्षकोंने हमें,
हलातोंसे डरकर नौका पार नहीं होती,
मेहनत करने वालों की
कभी हार नहीं होती ।।

शुक्रगुजार में हू उनकी,
जिन्होंने समझी उड़ान काबिलोंकी ।
शुक्रगुजार में हू जिनकी,
जिन्होंने दे दी दुवा रबकी ।।

तपना तो पडेगाही,
भलेही हों हालातोंकी भट्टीही सही ।
भलेही हो किस्मत कि
लकीरें गलत ही सही,
पर मेहनत की उड़ान
होंगी सफल ही वही ।।

तनुजा गोते (Project lakshya student)



## जाऊ द्या मला शिकायला....

सावित्रीच्या लेकी आम्हीं, तिने नाही केले आम्हा कमी
शेणाचे गोळे झेलून तीने, केले शाळेचे दरवाजे खुले
त्या मातेचे पांग फेडायला, जाऊ द्या मला शिकायला....

शिक्षण घेऊन डॉक्टर होईन, गोरगरिबांची सेवा करीन
का अडविता माझ्या शिक्षणाला, जाऊ द्या मला शिकायला.....

मुलगी म्हणून नका हिणवू मला, नाही कमी मी कशाला
घेईल झेप आकाशाला, जाऊ द्या मला शिकायला...

सार्थक– विद्या ने दिला मायेचा आधार,
आता होणार आमचे स्वप्न साकार,
आता नाही घेणार माघार, करणार आमचे स्वप्न साकार......

**माईंची कन्या –पूजा सावंत**
**ममता बाल सदन**

नवं स्वप्न पाहू दे
काळोखात माझ्या आज मला राहू दे
चुकलेल्या वाटेवर नावं स्वप्न पाहू दे
हळव्या काट्यांचे रंग जरा लेऊ दे
हरवलेल्या वळणाकडे पुन्हा पुन्हा पाहू दे
चुकलेल्या वाटेवर नवं स्वप्न पाहू दे

आयुष्यात जिंकण जरुरीच नाही
कधीतरी मागे सोडव काही
नेहमीच कशाला पुढे जायची घाई
आजतरी मला सर्वात मागे राहू दे
चुकलेल्या वाटेवर नवं स्वप्न पाहू दे

चढवा कुठवर घाट यशाचा
अपयशाचा तळ आजतरी पाहू दे
काळोखात माझ्या आज मला राहू दे
चुकलेल्या वाटेवर नवं स्वप्न पाहू दे
चुकलेल्या वाटेवर नवं स्वप्न पाहू दे .......

**प्रांजल नागवडे**
**प्रोजेक्ट विद्या**
**रांजणगाव २०२० batch**

---

किलबिल करत प्रभात वेळी चैतन्याचे फुलती मळे
विद्यादानाचे पावक धडे प्रोजेक्ट शिक्षा या योजनेत मिळे ।।

ज्ञानाच्या कणाकणातून स्फुती आम्हला मिळे
छंद नवे या छंदातून या ज्ञानातून विश्व घडवतो आम्ही नवे ।।

त्याग बंधुता स्नेह प्रेम नित्याहास हा आमचा नेम
करून संस्कार हृदयावरती भरून जाते ज्ञानाचे पेव ।।

कधी न होते हे रीते कुबेराचे जणु घडे
या घड्याच्या संस्कारातून आम्ही घडतो माणूस खरे
विद्या दालनाचे पावक धडे प्रोजेक्ट शिक्षा या योजनेत मिळे ।।

**साक्षी सुरेश येवले**

नाव: साक्षी सुरेश येवले
कराटे प्रशिक्षक (ब्लॅक बेल्ट १ st डिग्री)
नॅशनल जम्मू काश्मीर या ठिकाणी sambo (कुस्ती), पुणे या ठिकाणी रेफ्री एक्साम पास झाली आणि रेफ्री ट्रॉफी मिळाली
शिर्डी या ठिकाणी बॉक्सिंग mathch –२ medal
अहमदनगर या ठिकाणी कराटे फाईट –१ st gold medal
आता नॅशनलवरून बाहेर जाण्यासाठी ओलंपिकला रशिया या ठिकाणी फाईट खेळायला selection!!



१५

# देणाऱ्याचे हात हजार!!

## अक्षय्यतृतीयेचा संकल्प!

स्वाती नामजोशी

SARTHAK
WELFARE FOUNDATION




अक्षय्य त्रितीया म्हणजे साडेतीन मुहूर्तापैकी एक! आपल्या कडे त्यादिवशी शुभ कार्याची खरेदी, गोडाधोडाचं जेवण व सोनेखरेदी सारख्या गोष्टी केल्या जातात.

शुभारंभ करायचा तर समाजोपयोगी कामांचा सुद्धा करुया! सेलिब्रेशन करायचे तर आनंदाची देवाणघेवाण करुन का नको? गोडाधोडाचं खायचे तर भुकेल्या जिवाची भुक भागवून, आनंद इतरांना देउन देखील करावा की! आजही आपल्या संस्कृतीत सर्वात मोठं आणि पुण्याचं दान म्हणजे अन्नदान! तहानलेल्याला पाणी आणि भुकेलेल्यांना अन्न देणं ही तर आपल्या मानवतेच्या धर्माची ओळख आणि शिकवण!

आपली परंपरा जपताना, समाजभान आणि समाजऋण ठेउन समाजातील दुर्बल घटकांना आपल्या आनंदात सहभागी करुन घ्यावं! असा विचार करुन गेली काही वर्षे आम्ही अक्षय्य तृतीयेला वेगवेगळे उपक्रम करत आहोत.

कोविडच्या लॉकडाउन मधे, याच दिवशी आमच्या सोसायटीत सर्व कामगार, सिक्युरिटी, लेबर कँप मधील लोकांना औषध वाटप केले होते. तसेच कोविडमधे अडकून पडलेल्यांना अन्नवाटप तर कधी आमच्या विद्यार्थी मित्रमैत्रीणींना धान्य व औषधवाटप... असे वेगवेगळे उपक्रम करताना अतिशय उत्तम काम करणाऱ्या अनेक संस्था व व्यक्तिंची परिचय होत गेला. काम समजत गेले.

पुण्यातल्या पाच वस्तीमधे फुटपाथवर होणाऱ्या शाळेची माहीती मिळाली. ती शाळा घेणाऱ्या आम्रपालीचे मनापासून होत असलेले कार्य समजले. बेघर झालेल्या आणि अनाथ आजी आजोबांना सांभाळणाऱ्या प्रेमळ संस्थेची ओळख झाली. मानसिक विकलांग मुलांना, ज्यांना घरातून बाहेर काढले आहे अशांचा प्रेमाने सांभाळ करणाऱ्या ताईंची ओळख झाली. एचआयव्ही ग्रस्त आणि अनाथ बेघर झालेल्या मुलांचा सांभाळ व उपचार करणाऱ्या संस्थेच्या कामांचा परिचय झाला.

म्हणूनच मग यावर्षीच्या अक्षय्य त्रितीयेला अन्नदानाचा संकल्प सोडला. माझ्या बरोबरच इतरांनी सामिल व्हावे म्हणून एक प्रेमळ मदतीची हाक माझ्या मैत्रिणींना दिली फक्त.... आणि चहूबाजूंनी मदतीचा अक्षरश: प्रचंड ओघ सुरू झाला. अनेक जणींनी धडाधड अकाउंटला पैसे ट्रान्सफर केले. अनेकींनी मेसेज करुन अजून काही मदत लागेल का विचारले! अनेकींनी या उपक्रमांचे मनापासून कौतुक केले! आपापल्या ग्रुपमधे माझा मेसेज शेअर करुन, वेगवेगळ्या लोकांकडून मदत गोळा होऊ लागली....!

"देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी" हा प्रत्यय नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा आला! लोकांनी चांगल्या कामाला दिलेल्या प्रतिसादाने आणि माझ्या शब्दांवर टाकलेल्या विश्वासाने मी सद्‌गदित झाले. भारावून गेले.

आपल्या सर्वांच्या मदतीने आणि आशीर्वादाने आपण या वर्षीच्या अक्षय्य तृतीयेला अनेक संस्थांना या उपक्रमात सहभागी करुन घेता आले. आपण दिलेल्या मदतीतून, पुण्यातल्या पाच वस्तीमधे भरणाऱ्या फुटपाथवरील शाळेच्या सर्व मुलांना आपण जेवण, कपडे व खेळणी दिली आहेत.

अत्यंत गरीब व बेघर अनाथ आजी आजोबांना प्रेमाने सांभाळणाऱ्या शोध संस्थेला जेवण, ग्रोसरी व औषधे यांची मदत आपण देऊ केली आहे.

अनेक मानसिक विकलांगांना, ज्यांना घरात सांभाळले जात नाही त्यांची काळजी घेऊन संगोपन केले जाते व औषध उपचार केले जातात त्या हेल्पिंग हँडमधील लोकांना जेवण व ग्रोसरी व

औषधे या करता आर्थिक सहाय्य करत आहोत.
एचआयव्ही बाधित झालेल्या अनेक मुला मुलींना ज्यांना घरचे कुटुंबिय देखील सांभाळत नाहीत किंवा जी अनाथ आहेत अशा स्पर्श बालग्राम मधील सर्वांना आपण अक्षय्य तृतीयेला गोडाधोडाचे जेवण व शिधा वाटप केले.
मणिपूर, मिझोराम, नागलँड, पूर्वांचल मधील अनेक गरीब मुलामुलींना शिक्षणासाठी व स्वतःच्या पायावर सक्षम उभे राहण्यासाठी जनकल्याण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पूर्वांचल निवासी छात्र प्रकल्प राबवत आहे. आपण या निवासी प्रकल्पाला एक महिन्याची ग्रोसरीची मदत केली आहे व त्याच बरोबर सार्थक च्या माध्यमातून मुलींचे कौन्सिलिंग, करिअर समुपदेशन व मेंटॉरींग देखील करण्यात येणार आहे.
दररोज अनेक खेड्यापाड्यातून रुग्ण उपचाराकरता पुण्यात धाव घेतात. ससून रुग्णालयात बाहेरगावाहून आलेल्या शेकडो रुग्णांवर उपचार होतात. परंतू गोर गरीब रुग्णाच्या कुटुंबियांना मात्र रस्त्यावर किंवा कोठेतरी आसरा घेऊन रहावे लागते. दररोजचे जेवणाचे हाल होतात. पैसे पुरत नाहीत. अक्षय्य तृतीयेला आपल्या मदतीमधून, अशा गरीब कुटुंबियांकरता नाश्ता व जेवणाची सोय ससून रुग्णालयाच्या बाहेर सेवादीपच्या सहकार्यातून आपण केली होती.
जगी ज्यास कोणी नाही... त्यास देव आहे!! तो देणाऱ्याच्या हजारो हातांतून व समाजसेवकांच्या अविश्रांत कामातून व इच्छाशक्तितून अनेक चांगल्या कामाकरता कायमच मदत मिळवून देतो. आपण फक्त माध्यम असतो, देवाचे आशीर्वाद व अनेकांची मदत योग्य व्यक्ती पर्यंत पोहोचवणारे!
अक्षय्य तृतीयेचा शुभदिवस समृध्द व आनंदी केल्याबद्दल व तुमच्या आनंदात अनेकांना सामावून घेऊन तो द्वीगुणीत केल्याबद्दल व आपल्या सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल व भरघोस मदतीबद्दल मी आपली सर्वांची मनापासून ऋणी आहे!

स्वाती नामजोशी







Practice being selfless.
You end up getting more
than you anticipate.
When your soul is giving...

-Swami Vivekanand

१६

# TEAMWORK...

## स्वाती नामजोशी

SARTHAK
WELFARE FOUNDATION



Team Work Makes the Dream Work!
A goal without your plan is just a wish!!
Failing to plan means... Planning to fail!

उद्योग क्षेत्र, मग व्यवसाय–उद्योग कुठलाही असो, तुम्ही काळ–काम–वेग–पैसे आणि उपलब्ध साधने यांचे संपूर्ण नियोजन केले नाहीत की तुमच्या उपक्रमाची वाट लागलीच म्हणून समजा!

आमच्या म्हणजे समाजसेवा क्षेत्रातील अनेकांना असा समज असतो की समाजोपयोगी कामे केवळ उत्स्फुर्तपणे व सेवाभावाने पूर्ण होत असतात. परंतु कुठलेही काम जेव्हा संस्थात्मक स्वरूपात पुढे न्यायचे असते तेव्हा केवळ सेवभाव व चांगली माणसे एवढेच पुरेसे नसते. म्हणूनच अनेक सेवाभावी संस्था अतिशय चांगल्या हेतूने व उद्देशाने सुरू होऊन सुध्दा केवळ नियोजनाचा अभाव म्हणून मोडकळीस येतात हा माझा गेल्या अनेक वर्षाचे निरीक्षण व अनुभव आहे.

आपल्या उद्दिष्टांना मूर्त स्वरूप द्यायचे असेल तर आपल्याला अनेक गोष्टींचे कोष्टक तयार करावे लागते. त्या उद्दीष्टांपर्यंत पोहोचायला त्याला छोट्या छोट्या भागात विभाजन करावे लागते.

आपल्याला नक्की काय, केव्हा, कसे व किती वेळात साध्य करायचे आहे यावर आपले पुढचे प्लानिंग होत असते.

Short term And Long & term goals

हे साध्य करायला आपल्या हातात असणारा वेळ.

प्रोजेक्टचे अर्थकारण व उपलब्ध रक्कम.

–प्रोजेक्ट सफळ संपूर्ण होण्यासाठी लागणारी माणसे!

–प्रत्येकाला पूर्ण करायची जबाबदारी व कामाचे स्वरूप

–प्रोजेक्ट परीपूर्णतेचे निकष व अपेक्षा.

–त्याला लागणारे रिपोर्ट व रेकॉर्ड

हे सर्व कोष्टकात टाकले की आपला प्राथमिक ढाचा तयार होतो.. मग त्याला आपल्या अनुभवांच्या, प्रोफेशनल एक्सपर्टाईसच्या कानशीने चांगले घासायचे, इतरांनी खाल्लेल्या धक्क्यांवरुन शिकवण घेऊन आपण कायमच आपत्कालीन प्लॅन तयार ठेवायचा, सगळे हिशोब आणि ताळेबंद तपासून, बारकाईने वाजवून खणखणीत ठेवायचे..... आणि एखाद्या मातीच्या गोळ्याला आकार देताना, थापटून थोपटून, चाकावर आकार देऊन ते चांगलं भट्टीतून भाजून काढतात तद्वत... अशी सणसणीत प्लॅनिंग करुन सर्व समावेशक योजना तयार करावी लागते. तसे केले म्हणजे आपल्याला कायम साथ देणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन ती त्यांच्या हाती सूपूर्त करायची!

अर्थातच सहकारी अगदी आनंदाने ती पूर्ण करतातच! असे केल्याने उपक्रम यशस्वी पणे पार पडतोच पण वर्षाअखेरीस सर्वांच्या चेहऱ्यावर प्रोजेक्ट सफळ संपूर्ण झाल्याचा आनंद अनुभवायला मिळतो!!

म्हणूनच सार्थकच्या संपूर्ण टीमची आर्थिक वर्षाअखेर ही आनंदी व उत्साहाच्या वातावरणात, साजरी होते!

Because Team work makes the Dream works!!

स्वाती नामजोशी

We are extremely grateful to all our donors, project partners and associates, for their trust, support & active participation

# Donors

**Name of The Donor**

Mr. Tapan Krishnakant Mankame
Mr. Purushottam Gopal Deodhar
Mr. Sachin Baji Dabke
Ms. Archana Kamalakant Kualkarni-
Ms. Mrunal Prasad Rajhans
Mrs. Jayashree Ganesh Gangal
Mr. Umesh Chitnis
Mr. Sanket Maindarkar
Ms. Vaijayanti Madhukar Ketkar
Mr. Aniruddh Joshi
Ms. Vaishali Hanmantrao Gaikwad
Dr. Shilpa Aniruddha Joshi
Ms. Sumedha Ramesh Phadke
Mr. Parshuram Ganesh Date
Ms. Ashwini Sameer Shepal
Mr. Datta Shrikrishna Bagade
Mr. Tukaram Balkrishn Dudhale
Mr. Vishnu R. Marathe
Mrs. Jyoti Chandrakant Kale
Ossum Positive Souls Group
Ms. Medha Karwande
Mr. Chandrakant Sadashiv Kale
Ms. Manisha Mandar Garud-
Mr. Vijay Ambalal Pankhawala
Shubhashree Foundation
Mr. Rahul Sahasrabuddhe
Ms. Vaidehi Suresh Padhye-
Ms. Madhura Anand Ranade
Mr. Bhalchandra Pandurang Ganu
Mr. Rajesh Balkrishn Patil
Mr. Suhas Waman Sabnis
Ms.Shubhangi S. Deodhar
Mr. Nitin Narendra Vaidya
Ms. Manjiri Agashe
Ms. Tripti Mishra
Mr. Atul Vinayak Pai-
Ms.Manisha Sanjay Thosar
Ms. Sarita Mukund Deodhar
Mr. Anant Balkrishana Pethkar-
Mr. Sanjay Joshi
Mr. Jayant Benurwar



**We are extremely grateful to all our donors, project partners and associates, for their trust, support & active participation**

# Project Associates

## Associates & Project Partners

TENNECO

EMERSON

Fleetguard

KALYANI
DRIVING INNOVATION

Opus
Inspiring Payment Innovation
Opus Rural Foundation

Tech Prescient

## Associates & Project Partners


Seva Sahayog-
Vidyarthi Vikas
Yojana

Tenneco Clean Air India Pvt Ltd
Emerson Electric company (India)Private Limited
Fleetguard Filters Pvt. Ltd.
Career Disha
OPUS Software Solutions Private Limited
Mindtickle Interactive Media Private Limited

Farsighted Systems Private Limited
Ma. Ta. Helpline
Kalyani Technoforge Ltd.
T-Systems ICT India Pvt. Ltd.
Seva Sahayog Vidyarthi Vikas Yojana
Samavedana

















## Happy & Proud Moments














# Mentor & Mentees

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*


















# Mentor & Mentees





















# Laptop Distribution

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*













# Project Lakshya

*Making Life Meaningful*

SARTHAK
WELFARE FOUNDATION

















# Project Shiksha

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*


















# Project Saksham

*Making Life Meaningful*

SARTHAK
WELFARE FOUNDATION
















# Project Vidya

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*
















# Sarthak Aarogyam

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*


















# Mentoring Journey




SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

more than mentoring SARTHAK Maitra

# www.sarthakmaitra.org







## EDUCATION
Teach - Discover - Develop - Empower

SARTHAK
WELFARE FOUNDATION
*Making Life Meaningful*

## HEALTH
Physical - mental - psychological - emothional





## MENTORING
Interact - Understand - Empathise - Guide

## IMPARTING SKILLS
Learning - Development - Opportunity - Employability


**Sarthak Welfare Foundation**

**Registered Office :** Flat No. 4, Abhishek Complex, Happy Colony, Lane No.3,
Next to Shashwat Hospital, Kothrud, Pune 411 038.

**Office :** Flat No 4, Pancharatn Apartment, opp. Raja Shivrai Pratishtan school, Rambaug Colony,
Kothrud, Pune, Maharashtra 411038

9766 078 146/ 8830 979 640 / 9766 308 815

contactsarthakfoundation@gmail.com careerdisha2020@gmail.com

www.sarthakwelfarefoundation.org

makealifemeaningfull@gmail.com